डॉ. नितीन मोरे

# प्रिय पत्रास,



# प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

प्रिय पत्रास,

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रिय पत्रास,

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २४ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रिय पत्रास, - या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

**डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:**

चक्रमादित्याचा दरबार(नाटक)

केल्याने शीर्षासन,

नाच जमूरे नाच,

अहम ब्रह्मास्मि,

मच्छर टाईम्स,

संवादोनी प्रकटावे

या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )

प्रेमातुराणां (नाटक)

चक्रमादित्याचा दरबार-२ (नाटक)


सांगतो ऐका (एकपात्री)


ही सर्व पुस्तके

ई साहित्यच्या वेबसाइटवर


उपलब्ध आहेत.


www.esahity.com





डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
(HALL OF RESIDENCE)
प्रेमातुराणां


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

## डॉ. नितीन मोरे यांच्या अकराव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम

करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान

# आऊटबॉक्स!

*एक छोटे पत्र.. प्रस्तावनेदाखल!*

पत्र आणि संवाद.
आजकाल इन्टंट संवादाच्या जमान्यातही पत्राचा चार्म टिकून आहे..
कारण पत्र आपले हृदय खोलून दाखवण्याची संधी देते.
आजकाल पत्र लेखन कमी झाले तरी त्याचे महत्व नाही कमी झाले..

या संग्रहात अशीच काही पत्रे आहेत.. पहिलेच पत्र.. या पत्रास उद्देशूनच आहे.
आणि बाकी आहेत काही गंभीर तर काही खेळकर.. आणि अर्थात काही उपरोधिक!

'ई साहित्य'वर प्रकाशित करताना लेखनाचे नवनवीन फॉर्म हाताळण्याचा आनंद आहे.. त्यात हे पत्रांचे पुस्तक.. पसंत पडावे अशी अपेक्षा आहे.

डॉ. नितीन मोरे

## अनुक्रमणिका


१ प्रिय पत्रा..

२ आता तरी येशील का?

३ प्रिय ढगास,

४ द मदर्टंग.. माय मराठीस

५ माझ्या प्रिय बालपणा

६ प्रिय रूपयास

७ उलट्या चष्म्यास

८ प्रिय विनोदास

९ धिनचॅक गंगूस

१० सत्तासुंदरीस पत्र

११ छंदीफंदीस

१२ प्रिय मी

१३ अनादि अनंतास

१४ प्रिय मृत्यूस

# १
# प्रिय पत्रा..

नमस्कार..
पत्रास कारण की,

अगदी सुरूवातीलाच सांगून टाकतो तुला.. तू म्हणजे या ह्रदयीचे त्या ह्रदयी घालणे.. एकदा हे सांगितले म्हणजे पुढे अजून तुझ्याबद्दल लिहायला नको.. पण आता लिहायला बसलोच आहे तर या हृदयीचे हितगुज करूनच टाकतो तुझ्याशी.

पूर्वी ख्यालीखुशाली सांगायला तू यायचास नि जायचास.. फार काही पूर्वीची नाही ही गोष्ट.. थोडीफारच वर्षे झाली.. गावातच काय शहरा शहरातही लोक वाटेकडे डोळे लावून बसायचे तुझ्या. कारण तेव्हा तूच एक होतास जो कोणा प्रियजनाची खुशाली कळवायचास. दूरदेशीची सासुरवाशीण असो की तिचे माहेरवासी असोत.. दूर शिकायला की नोकरीला गेलेला घरातला कोणी असो.. की दूर सीमेवर जीव धोक्यात घातलेला जवान असो.. साऱ्यांचे क्षेम कुशल कळवणे तुझीच जबाबदारी असायची. तुझ्या येण्याकडे डोळे लावून बसायचे लोक .. चातकासारखी वाट पाहात बसायचे. नि तू आला नाहीस तर लोक हिरमुसलेपणाने घालवायचे दिवस. तू आलास की आयाबाया आपल्या पोरीच्या खुशालीने खुशाल व्हायच्या. कधी त्यात गोड बातमी असायची कधी नुसतेच क्षेम.. कधी सासरच्या छळाची उघडपणे कळून येऊ नये अशा शब्दांत आपल्या आईबापास लिहिलेली कहाणी. तिकडे ही सासुरवाशीण आपल्या भावा नि बहिणींच्या वा आईबापांच्या पत्राची वाट पाहात बसलेली. एखादा रमेश कॉलेजच्या शिक्षणासाठी पडला बाहेर तर आई काकुळतीने सांगायचीच.. पत्र पाठवत रहा रे बाबा! रमेश पण त्याच्या स्वभावानुसार वागायचा.. तारुण्याच्या त्या उत्साहात हमखास लिहायचा कंटाळा करायचा नि इकडे घरच्यांच्या छातीची धडधड वाढवायचा. प्रेमी जिवांचा तर तूच एक आसरा होतास. प्रेमपत्र नावाने तुझे नाव गाजत असायचे तेव्हा. मला आठवते कॉलेजमध्ये होतो तेव्हा काही धाडसी प्रेमवीर तुझा वापर करू पाहायचे. त्यातले काही व्हायचे यशस्वी.. काही पकडले जायचे नि कॉलेजात उगीच बदनामही व्हायचे. एकूण तू हवाहवासा होतास आणि आनंद .. नाहीतर कमीतकमी दिलासा तरी.. देऊन जायचास.

अर्थात तू तसा नेहमीच फक्त आनंद द्यायचास असे नाही.. तुझी ती बहीण.. तिला तार म्हणायचे.. ती आणायची बहुधा दु:खद बातम्या. म्हणजे ती आली .. तिला घेऊन येणारा

तारवाला आला की.. लोकांच्या हृदयाची धडधड वाढायची. थरथरत्या हातांनी उघडायचे ती तार. ती यायची तीही कित्येकदा रात्री नि मध्यरात्री! अशी तुझी ती बहीण असली ना तरी तू मात्र सर्वांचा लाडकाच होतास हे खरे. तेव्हा तर होतासच.. पण काळ बदलला.. खरेतर तू नाहीच बदललास पण लोकच बदलले आता. तू होतास तेव्हा लोक पोस्टमन काकांची कशी आतुरतेने वाट पहायचे. गावागावांत तर ते पत्र दात्याचेच काय तर  वाचण्याचेही करायचे काम.

आज तुलाच लिहितोय पत्र .. कारण तूच  आज दुर्मिळ झालायस. पहिल्यांदा तो टेलिफोन आला.. तरी तू टिकून होतास तसा.. कारण तसे टेलिफोनही तितके सर्वांघरी नसायचे. आणि तसेही एका घरातल्या फोनवर सर्वांसमोर उघड सारे काय कोणी बोलणार? तिथे लेखणीच हवी.. आणि त्यासाठी तूच कामी यायचास हे खरे. पण मग मोबाईल फोन्स आले. त्यांच्या हल्ल्यापुढे तुझा नाही लागला पाड. एका क्षणात इकडची बातमी तिकडे जात असताना कोण तुझ्या मागे जाणार? परत वर घरोघरी प्रत्येकाला एक या हिशेबाने आले ते मोबाईल. त्यात बोलण्याचीही गरज नाही.. नुसते संदेश लिहून पाठवणे शक्य झाले नि तुझा भावच उतरला जणू! आज तुझे ते प्रेमळ दर्शन झाले दुर्मिळ.
पण फार जुन्याही नाही नि आजच्या दिवसांबरोबरही जमवून घेणाऱ्या अशा आमच्या पिढीला तू आठवत राहातोस हे खरे. तू गेलास तो point of no return म्हणता येशील असा. तेव्हा गेलास तो गेलास तू नेहमीसाठी. पण तशी आमची पिढी नशीबवान कारण तुला जवळून पाहणारे आम्ही शेवटचे..

मला आठवतेय..
पत्र लिहिणे वाटायचे तितके सहज नसायचे. साधी पत्रे तशी नेहमीच्या मायन्यात जखडून यायची..मग ते मायने तीर्थरूप .. तीर्थस्वरूप नि चिरंजीव यापुढे जायचे नाहीत. पुढे त्यात कृतानेक नमस्कार.. किंवा सप्रेम.. साष्टांग वा शिरसाष्टांग नमस्कार..वा..अनेकोत्तम आशीर्वाद..असले एक्स्टेंडेड मायने यायचे. मजकूर तसा साधाच असायचा.. म्हणजे..  तब्येतीची काळजी घेणे.. उलट टपाली खुशाली कळवणे वगैरे.. किंवा मी इथे मजेत आहे.. काळजी नसावी..  किंवा लवकरच येणे करावे.. सुट्टी मिळणे कठीण आहे.. वाट पाहात आहे..  वगैरे प्रसंगानुरूप.  तरी देखील बहुतेकवेळी त्या चार ओळी वाचून लोक खुश व्हायचे. खरा कठीण मामला मात्र त्या प्रेमपत्रांत असावा. असंख्यवेळा खोडलेले मायने.. नुसतेच प्रिय की प्रियतमा.. की अजून काही.. पुढे काय काय काव्यमय मजकूर.. कुठून कुठून शोधलेल्या कविता नि बाकी काय काय ..

पण एकूण पत्र लेखन ही तेव्हा एक कला होती. लोक आपले ह्रदय उघडून दाखवल्यासारखी लिहीत कित्येकदा. काही अगदी बिझिनेसवाली किंवा कामापुरतीही असतील पण सर्वसाधारण पत्रांतून नुसतीच खुशाली नसे कळत. त्यातून प्रेम ओतू जाई. आज ते मायने नाही उरले नि ती 'आपला आज्ञाधारक' म्हणवणारी मुलामुलींची जमात ही नाही उरली.

विचार केला तर वाटते.. कालाय तस्मै नम: .. कालानुरूप बदल होतात.. होत राहातात. व्हावयासही पाहिजेत हे खरे.. पण ते होताना आत कुठेतरी काहीतरी गमावल्याची भावना होते मनात.. तसेच  तुझे काहीसे आहे.
तुझी ती बहीण.. तार .. नाहीशी झाली.. कालवशच म्हणा. तसा तू अजून आहेस तग धरून .. पण आज बदलले सारेच. तू आहेस..पण कसा? व्यक्तिगत स्वरूपातला तू नाहीसा होण्याच्या मार्गावर आहेस. जो उरला आहेस तो फक्त ऑफिशियल कागदपत्रे पाठवण्यापुरता. बँकाची पत्रे नि विविध ऑफिसच्या नोटिसा.. नुसती कायदेशीर कम्युनिकेशन्स.. ज्यात तू पोहोचल्याचे पुरावे गोळा करता येईल अशा स्वरूपातला उरला आहेस तू.

पण खरे सांगू का.. हे होणारच.. पूर्वी कबुतरे पाठवायची संदेश.. ती लुप्त झाली .. असेच म्हणा किंवा तुझ्यामुळे म्हणा..तू आलास.. किंवा तुझे राज्य आले म्हणा.. पण शेवटी काय संवाद..कम्युनिकेशन .. महत्त्वाचा .. तुझे स्वरुप भले बदलले असो पण लोकांची ती गरज पूर्ण होतेच आहे.. फक्त आजच्या त्या तंत्रज्ञानात  तुझ्यातला तो ओलावा नि तुझ्यातली ती गोडी आता असेलच असे नाही.. काळ प्रवाही आहे .. बदलत राहिल.. आजच्या या मोबाईलच्या संवादाची जागा अजून कुणी घेईल.. पण तू सदैव मनात राहशील.  कितीही चकचकीत आली ती साधने संवादाची .. पण तुझे ते गारूड.. त्याची तुलना नाही होऊ शकणार कोणाशी .. थोडक्यात काय तर माझ्या या हृदयीचे तुझ्या हृदयी घालतोय या पत्रातून..

तुझाच..

ता. क. तुला लिहितोय पत्र नि हा ता.क. विसरून कसा चालेल? तू असशील तर हा ताजा कलम तर हवाच. तर हे पत्र ही कसा अपवाद असेल? तर हा ता.क. तुझाच एक भाग असायचा. कित्येकदा हा ताजा कलम पत्राहूनही महत्वाचा असायचा. कधी आठवण करून द्यायचा तर कधी इशारे द्यायचा, कधी ताकीद द्यायचा.. हा ता.क. तुझी आठवण येते म्हणून.. परत जमल्यास भेटूच..

# २

# आता तरी येशील का ?

प्रियतम...
आपले पत्र पावले. आपण कुठल्या हिशेबाने सांगत आहात की आपण मे महिन्यापर्यंत मोकळे व्हाल? आणि इकडे येण्याचे कराल? आपला इरादा नेक दिसत नाही. आम्ही आपल्यावर खफा आहोत. एका माणसाने इकडे न येण्याचेच ठरवलेले दिसते. आपल्या वाटेकडे पाहून आमचे डोळे शिणले आहेत. हे पत्र तार समजून लागलीच निघून येण्याचे करावे. ते ही आमची प्रकृती तोळामासा होण्याअगोदर.. शीघ्र पत्रोत्तराबरोबर व्यक्तिश: शीघ्र गतीने येण्याचे करावे. राणीसरकारांचा हुकूम समजून उलटपावली न आल्यास यथायोग्य समाचार घेऊन सजा फर्मावली जाईल याची नोंद घ्यावी..
.... तुझीच

प्रियतमे..
तुझे पत्र पोहोचले. तुझ्या पोष्टाचा स्पीड चांगलाच जलद दिसतो. त्यामुळे ते पत्र रमतगमत आणि डुलत डुलत आठवडा भरात पोहोचले इथवर.
तुझ्या भाषेची गंमत वाटली.
तू मीनाक्षी नसून साठीच्या दशकातील कोणी गोपिकाबाई लिहित असाव्यात असे वाटले वाचून. छान जमते तुला असे लिहावयास.

येण्याचे म्हणशील तर इथून सवड मिळणे कठीण. You know my boss..खत्रुड is the only word. Anyhow..प्रयत्न करतो.

किती मस्त वाटतेय पत्र वाचताना सांगू.. हस्ताक्षराचा ओलावा टाईप केलेल्या अक्षरास नसतो..
इतपत ऑफिशियल मजकूर पुरे..
पुढे काम की बात..

किती महिने झाले प्रिये.. स्वप्नातही तू दिसत नाहीस इतका मिस करतोय तुला. दिल करता है उडकर आऊं.. सामने बैठूं.. और दोहराऊं...इथे नदीकाठी संध्याकाळी मस्त हातात हात घालून फिरायला किती मजा येईल.. पण हाय .. नुसतेच प्रिया आज माझी नसे साथ द्याया.. म्हणताना कंटाळा येतो. प्रेमी जिवांची ताटातूट करणाऱ्या या नोकरीच्या बैलाला ढोल.. ढोल आणि बैल.. जरा जास्तच देशी वाटतात नाही असल्या हृदयद्रावक मजकुरात? पण आतून आलेले आहेत ते dear!

चल.. थांबतो.. माझ्या गुलाबाकडून लगेच उत्तर येऊ देत.. मोगऱ्यासारख्या टपोऱ्या अक्षरात! किती मजा ना गं खरीखुरी पत्रे वाचताना!

... तुझाच

प्रियतम,

गुलाब आणि मोगरा!

आम्ही असल्या चापलूसीस भुलू ऐसे आपणास वाटत असेल वाटत असेल तर तो आपला घोर गैरसमज आहे. फुलांची नावे ठेवून fool ( गोपिकाबाईही काही इंग्रजी बुके शिकल्यात म्हणावे ) बनवण्याचे इकडून घाटत आहे असा राणीसरकारांच्या मनाचा समज झाला आहे. त्यास प्रत्यक्ष भेटी अंती खुलासा केल्या वाचून समाधान होणे नाही. तरी सबबी न देणे. आपण हिंदी सिनेमा.. नाट्यगीते..भावगीते.. वगैरेची उजळणी येथे येऊन केल्यास उत्तम. हात तुझ्या हातात .. धुंद ही हवा हे गाणे जास्त योग्य होईल असे वाटत नाही का आपणांस? तशी आम्हास ही गाणी येतात. तेरी दो टिकीया की नौकरी में मेरा लाखोंका सावन जाए.. काय म्हणायचे ते कळले असेलच! म्हणून मनोवेगाने येण्याचे करावे म्हणजे आम्ही संतुष्ट होऊ.. कळावे .. लोभ असावा..

...तुझीच

प्रियतमे..

प्रियेची नाराजी ओळखून चंद्राच्या चकोराची सय येते गं.. तू म्हणालीस ते खरे.. दो टिकिया की नौकरी.. फार पूर्वी बोनापार्टांच्या नेपोलियनाला समजलेले सत्य सांगतो राणीसरकारांस.. सैन्ये पोटावर चालतात.. तद्वत ही

संसाररूपी लढाई पोटावरच जिंकली जाईल! काय हा दुनियेचा न्याय! तू म्हणतेस तशी गाणी गायला आवडेल मला. किंवा नाहीही आवडणार.. का ते ओळख? करेक्ट ओळखल्यास तू ओळखशील त्याच्या शंभरपटीने तुला बक्षीस! हसू नकोस.. हे बक्षीस दोघांत विभागून असेल हे तुलाही ठाऊक आणि मलाही! असो .. पण तुझ्या पत्रलेखनास दाद द्यायलाच हवी राणी! एखादा खलिता धाडल्यासारखी पत्रे तुझी. काय सांगू मी तुझ्या पत्राची किती वाट पाहात होतो. ही मजा खऱ्याखुऱ्या पत्रातच.. हुरहूर, बेचैनी आणि भाषिक करामती...old is gold..या फास्ट जमान्यातही आपली snail mail would win! आपली भेट प्रत्यक्ष नाही .. पण पत्र रूपी तर होते.. हे ही नसे दोडके...sorry थोडके!

असो.. तू थोडक्यात सारे लिहून जातेस.. मला शब्दांचा फाफटपसारा मांडायला लागतो. माझे गुल्लाबाचे फुला.. आमाचा लोभ आहेच. आणि प्रत्यक्ष भेटीची ओढ ही आहे. तोवर..

..तुझाच

प्रियतम..

जिथे सागरा धरणी मिळते.. तिथे तुझी मी वाट पाहाते.. नच आलास तर वाट लावते..

...तुझीच

प्रियतमे..

काय हे गुलबानो.. गुल गुलशन गुलफाम.. गुलाबी गुलाबाच्या फुला.. किती ही नाराजी.. मोठ्या उत्सुकतेने हे पत्र उघडले तर त्यात फक्त दोन ओळींचाच मजकूर? तो ही खंडणी मागितल्यासारखा? राणीसरकार कमीतकमी शब्दात ठासून अर्थ भरण्यात माहिर आहेत.. पण या चातकास काही शब्दांचे तुषार चोचीत पडण्याची आस आहे.. गोपिकाबाईंनी इतके नाराज होऊ नये.. आम्ही आलो की आपला राग शांत करूच.. तुम्ही ते कोडे.. मागील पत्रातील.. सोडवलेत का? सोडवाच.. मनातल्या मोर पिसांची शपथ तुला आहे.. दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे..

... तुझाच

प्रियतम..
प्राणनाथ.. इस नाचीज को लिखनेका बहुत कंटाळा आता है! तुझी ही पत्रे आतुरतेने वाट पाहात वाचते मी राजा! लिहू पाहाते पण लिहिता येत नाही.. पण ते गाणे खरेय.. पत्र तुझे येता अवचित.. गाली लाली खुलते नकळत..
...तुझीच

प्रियतमा..
Thanks..किती बरे वाटतेय सांगू राणी.. आणि एका गुलाबी गुलाबाच्या फुलाचे गाल.. लाल.. लाल..! किती बरे वाटतेय सांगू.. ते कोडे सोडवायचे सोडून दिलेस की काय? हिंट देऊ? गाण्यासाठी तोंड वापरायचे की.. बस इतकीच हिंट.. तशी तू माझ्याहूनही चतुर, चाणाक्ष आणि लब्बाडही आहेस हे मला ठाऊक आव राणी.. कधी वाटते असल्या पत्रांसाठी तरी काही दिवस दूर रहायला हवे की काय? तुझे मोत्यासारख्या अक्षरांतले पत्र.. त्यापुढे माझे गिचमिड.. पण कसे ही असो.. पण राणी भावना सच्च्या आहेत सोळा आणे! ऑफिसच्या बैलाला अजून एकदा ढोल.. मधुराणी तुला सांगू का..
...तुझाच

प्रियतम..
तुझे पत्र मिळाले. मजकूर समजला. कळावे. इतकेच लिहिणार होते मी! प्रतीक्षा करण्याची शिक्षा.. तुझ्या दर्शनाची वाढ भिक्षा.. तुझे कोडे उलगडले आहे मला..आलास की प्रत्यक्षच तोंड देईन तुझ्या प्रश्नास! मग ते शंभर पटीने वाढवायचे की नावे ते तू ठरव. तूर्तास वाट पाहणे.. कधी रे येशील तू.. जिवलगा!
...तुझीच

प्रियतमे..
हाय.. नको असे जीवघेणे लिहित जाऊस.. इथे दिवस सरत नाहीत.. त्यात तुझे असले पत्र.. कितीदा गाऊ.. प्रिया आज माझी नसे साथ द्याया.. तुला आठवते..

आपण त्या सिनेमाला गेलो होतो.. त्यातले ते गाणे.. दिल दीवाना.. बिन सजनाके मानेना.. आज अजून लिहवत नाही राणी.. ऐक .. नको जाऊ कोमेजून माझ्या प्रीतीच्या फुला..

...तुझाच

प्रियतम...

ये पगला.. समझानेसे समझेना..! आम्ही फक्त आमच्या राजकुमाराची वाट पाहतोय.. आतुरतेने.. काही होवो.. तू असा जवळी रहा.. किती हार्टलेस रे तुझे ते ऑफिस.. मी किती वैतागलेय सांगू..?

...तुझीच

प्रियतमे..

गुलबदन गुलाबी गुलाब.. माझ्या फुलाने असे कोमेजू नये.. उदास का तू.. आवर वेडे नयनातील पाणी.. लाडके.. आम्ही मोहीम फत्ते करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोत. आपल्या हस्तस्पर्शाने पुनीत झालेल्या खलित्याच्या कागदाचा सुगंध आमच्या काळजात भरून घेत आहोत. मग तो गंध आमच्या धमन्या धमन्यांतून वाहील.. नखखिशांत.. पोहोचेल ते..आठवते ते नखखिशांत? शाळेतल्या बाईंनी उपटले होते माझे कान.. तू तेव्हा दोन वेण्या घातलेली .. पहिल्या बाकावर बसून हसलेलीस मला.. नखशिखांत! आठवतेय अजूनही.. आज फारा दिवसांनी आपल्या लव्हस्टोरीच्या सुरूवातीची याद आली.. आणि नखखिशांत गेलो मोहरून! मुश्कील है बहुत आसान नहीं है.. प्यार भुलाना बचपन का!

...तुझाच

प्रियतम..

बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला.. तुझे पत्र वाचून आठवली ती गोष्ट.. किती फिदीफिदी हसलेले मी तुझ्यावर! नखशिखांत! तोच तो क्षण राजा.. तुझ्ता चेहऱ्यावरचे निरागस भाव.. मी हसले खरी .. पण खरे तर तिथेच फसले.. तू खाली बसेतोवर मला किती वाईट वाटले सांगू.. म्हणजे तुला मी ते कधीच सांगितलेय.. कल्पना कर.. त्या खिशातून निघालीय

आपली ही स्टोरी! ते सोड.. येतोस कधी ते सांग.. वाट पाहून डोळयांच्या झाल्यात खाचा.. लिखो कब आओगे.. तुम बिन ये घर सुना सुना है..
...तुझीच

प्रियतमे..
परत राणी हे.. हे काय? रुलायेगी क्या पगली? त्या प्रेमकथेला सुरूवात खिशातून झाली.. नि खिशातच संपणार होती ती.. remember माझ्या खिशातले ते प्रेमपत्र.. सुरंगी सुमधुर सुंदरीस.. सुरूवातीचा सुयोग म्हणून लिहून ठेवलेले खिशात. ते नेमके पडावे टीचरच्या हाती.. त्या सु सु वाल्या पत्राने माझे डोळे सु-जवले चांगलेच! आणि लबाड तू.. त्याकडे सु-चतुरतेने सु-कानाडोळा केलास.. अजून नाही विसरलोय.. आलो की घेईनच बदला!
...तुझाच

प्रियतम..
येच राजा.. कधी येतोस? बदला घ्यायला तरी ये.. विरहाग्नीत जळतेय ही राधिका.. कृष्णाची सखी..
...तुझीच

प्रियतमे..
कृष्णाची राधा.. रोमियोची जूलिएट.. आठवतेय.. कॉलेजच्या नाटकात होतो आपण दोघेही.. तू नि मी.. नाटकातले नवरा बायको.. प्रत्यक्षात होण्याअगोदर..
मस्त होते नाटक ते.. नाटक कसले.. real life! तू किती छान करायचीस काम स्टेज वर. मी तुला पाहात राहायचो नुसता.. विसरायचो आपल्या लाईन्स..rather लायनी मारताना लाईन्स विसरायचो.. आपला डायरेक्टर होता ना समीर.. कसली तडी दिलेली त्याने मला.. तुझ्यामुळे .. couldn't help.. तुझ्याकडे पाहताना मी सगळे विसरायचो.. लायनींचे काय.. जास्त नाहीत.. साताठ वर्षे झाली .. मंतरलेले दिवस ते राणी..wish they come back..

...तुझाच

प्रियतम..

मी विसरेनसे वाटते तुला? नाटकातल्या नाटकात.. मध्ये स्टेजवर अंधार झाला तेव्हा तू कानात येऊन कुजबुजलास..ते I love you.. मी क्षणभर विसरलेच होते माझा डायलॉग.. त्या नाटकात नंतर होता तो आपल्या भांडणाचा सीन.. मला चिडायचे तुझ्यावर नि तू ..I love you .. बोलतोयस.. फजिती होता होता बचावले मी.. विसरले नाही अजून..wish those days are back..इतकी वर्षे लोटली.. खरेच नाही वाटत.. मी तुझी आठवण काढून इकडे तळमळतेय नि तू आठवणींची पुरचुंडी.. पुरचुंडी कसली .. पोतडेच उघडून बसलायस..

...तुझीच

प्रियतमे..

काय करू राणी? इकडे ऑफिस तिकडे बॉस .. कामाचा डोंगर नि त्यात सतत दिसत राहणारी तू.. विरहाग्नी! खरा शब्द आहे ना? भाषा आपली ग्रेट आहे. बिरहाकी आगमें जलना.. ये भी कोई जीना है.. ये भी कोई मरना..आठवतेय एकदा आपण त्या नदीकिनारी बसलेलो.. समोर सूर्यास्त.. रंगीबेरंगी आकाश.. हात तुझ्या हातात.. धुंद ही हवा.. तू म्हणालीस .. तू असा जवळी हवा.. मी म्हणालो.. चल घेऊया चहा! एक एक आठवण माझी सखी आहे गं..

...तुझाच

प्रियतम..

राजा.. किती रे रडवशील? ते राणी न बिणी .. सरकारबिरकार.. काही कामाचे नाही रे.. तुला आठवतात त्या गोष्टी मी विसरेन का रे? तिथे खाल्लेल्या मक्याचा दाणा न दाणा आठवतो.. म्हणजे दाणादाण आठवते.. माकड हातातले कणीस हिसकायला आले त्यावेळेची! कसले रे दिवस ते! आठवायला लागले की अजूनच आठवायला लागतात.. करोगे याद तो .. कुछ और याद आएगी..

...तुझीच

प्रियतमे..
खरंय राणी.. पण हे दिवस सरतील.. दिस जातील.. दिस येतील.. भोग सरल .. सुख येईल.. तुझ्यामाझ्या संसाराला आनि काय हवं.. पुढे लिहवत नाही..
...तुझाच

प्रियतम..
होय रे.. तुझे माझे लेकरू.. मी पण पाहतेय वाट.. त्याची किंवा तिची! तुझंमाझं लेकरू.. आणि आपले घरकुल.. पण त्याआधी.. मी रागावलेय तुझ्यावर.. तुझे ते दूरदेशी जाणे.. मी आता बोलणार नाहीए तुझ्याशी ..
...तुझीच

प्रियतमे..
हं.. नकोस सखे अशी रागावूस.. का गं अबोला.. बोल काहीतरी बोल माझ्या फुला.. जरी बोलणे हे तुझे चांदण्याची सुरी! लेकराची वाट मीही पाहतोय गं.. मी असा परदेशात.. तूच येऊ शकली असतीस तर? मला ठाऊक आहे ते शक्य नाही .. आता.. माझ्यासाठीही.. पुढे कधी.. तू असतीस तर फुलला असता चांदण्यांचा मळा..
...तुझाच

प्रियतम..
नको रे राजा.. भरून येतो गळा.. थकले रे नंदलाला.. लिहून लिहून थकले .. दमले तुझ्या येण्याची वाट पाहात.. मला वाटते मी तेच तेच लिहितेय का? लिहिणे बंद करू? तू वैतागला असशील तेच तेच वाचून..
...तुझीच

प्रियतमे..
नाही गं.. तुझ्या पत्रांवर जगतोय मी.. तुझ्या हातांचा स्पर्श झालेला कागद .. तुझी पत्रे मी पुन्हा पुन्हा वाचतोय.. रिव्हिजन म्हण! इथल्या शुष्क

वातावरणात तोच विरंगुळा नि दिलासा ही.. तुझे पत्र वाचले की तू जवळ असल्यासारखे वाटते. वाटते तुझ्या हातांचे हार आहेत गळयात.. मी त्यांना आंजारतोय.. गोंजारतोय.. तू मला बिलगून म्हणतेस.. शोन्या..
तुझा तो आवाज ऐकायची खूप इच्छा होते गं.. लिहिल्याने मन तरी होते मोकळे.. तू लिहीत रहा.. तोच माझा प्राण आणि प्राणवायू..
...तुझाच

प्रियतम..
Sorry..आजवर मी माझाच करत होते विचार.. तू पण एकटाच आहेस .. तेही दूरदेशी .. तुलाही एकटेपणा सोसत नसेल .. कधीच रे मी असा विचार नाही का केला? माझी मलाच वाटते लाज.. यापुढे मी नाही रे रागावणार तुझ्यावर .. खोटेखोटे ही नाही. खरेच.. शपथ! पण काय करू रे.. I miss you.. सैरभैर होते मी एकटी.. आपण भेटलो तेव्हा चंद्र होता साक्षीला.. त्या चंद्राची शपथ..
...तुझीच

प्रियतमे..
प्रिये.. प्राणप्रिये.. तुझ्यातला प्राण गेल्याला आज बरोबर एक वर्ष झाले. तू गेलीस.. आपल्या बाळाच्या निशाणीसह.. तू होतीस एक उत्साहाचा झरा.. सतत गुणगुणायचीस तू.. ती सारी भावगीते तुझ्या आवडीची.. तुझ्या आवाजात माधुर्य होते. नाद होता. आज तू जिथे पोहोचलीस तिथून माझी आठवण काढत असशील. तू होतीस. कॉलेजपासून.. खरेतर शाळेपासून आपली साथ. मग कामानिमित्त माझे दूर राहाणे.. आता असतीस तर तू मला नि मी तुला असलीच पत्रे लिहिली असतीना गं... आज अनावर होऊन लिहायला बसलो तुला.. तर तू लिहिल्यावाचून माझे पत्र कसे होणार गं पूर्ण? मग मी तुझीही लिहून काढली पत्रे.. तू असेच लिहिले असते ना गं.. मी ओळखतो गं तुला.
डाव अर्धा मांडून .. नि मोडून तुला जायला लागले. भातुकलीच्या खेळामधली राणी अर्ध्यावर डाव सोडून गेली. ते गाणे तुला आवडायचे फार. तशी तुला असली गंभीर म्हणा .. किंवा दु:खभरी म्हणा गाणी आवडायची नाहीत. पण हे गाणे आवडायचे तुला. कित्येकदा नकळत पाणी यायचे तुझ्या डोळ्यांत ते

ऐकताना. मी पाहिलेय ते तुझ्या नकळत. तुला असे होणार हे ठाऊक होते का गं? खरेतर हे जीवनच भातुकलीचा खराखुरा डाव आहे असे वाटायला लागलेय मला. सारे त्यात खोटे हे खेळणाऱ्या चिमुकल्याना समजत नाही.. पण कधीतरी उमजतेच ते! डावावरून कोणीना कोणी कधी ना कधी जाणारच.. पण थोडा वेळ तरी खेळण्यास जास्त मिळावा ना? जर आणि तर.. काय अर्थ आहे सखी आता..बहुधा तुझी गरज त्या स्वर्गात जास्त होती काय न कळे. तू गेलीस सोडूनिया आत सर्व धागे.. हे ही तुझे आवडते गाणे होते ना गं? ती बगळयांची माळ अजूनही अंबरात फुलते. सारे काही तसेच.. मीही तसाच आहे वरून.. फक्त तू असतीस तर? शेवटी एकच.. तू येणार नाहीस हे माहित असूनही.. सखी मंद झाल्या तारका.. आता तरी येशील का?

... जन्मजन्मांतरी तुझाच

# ३

# प्रिय ढगास,

फार फार वर्षांपूर्वी तू एका कविच्या सांगण्यावरून गेला होतास.. संदेश घेऊन. ठाऊक आहे मला.. दूत म्हणून गेलेलास ते.
तो कवी थोर होता हे खरे.. आणि आपल्या प्रियेला संदेश पाठवत होता हे खरे.. पण तू संदेश घेऊन गेलेलास तो कवी थोर म्हणून की त्याची ताटातूट झालेली म्हणून?
काय आहे आमच्या इथे मोठ्यामोठ्या लोकांची कामे सहज होतात.. ते काम किती महत्वाचे किंवा कसे हे महत्वाचे नसते.. पण तुझे तसे नसणार.. कारण या युगाचा तो चापलुसीचा धर्म तुला तेव्हा कुठून ज्ञात असायला.. तेव्हा त्या विरहावर सहानुभूतीची फुंकर मारायला म्हणूनच तू गेला होतास रे?

तर ही नांदी झाली.. आणि थोडे तुझे लांगुलचालन! आता तुला अंदाज आलाच असणार.. आजचा माणूस गोड बोलतोय म्हणजे.. त्याचे नक्कीच काहीतरी काम असणार!

तर ढगास..,
ढग म्हणालो म्हणून रागावू नकोस. वाघ म्हटले की खातो नि वाघ्या म्हटले की ही खातोच! हे उदाहरण अगदीच संयुक्तिक नाही हे मान्य पण तरी तुला मेघ न म्हटल्याबद्दल रागावून फुगू नकोस.. फुटशील नि खाली होईल वर्षाव!
तसे तुझे फार चूक नाही म्हणता यायचे.. काय आहे ना भाषा थोडी जटिल वापरल्यावाचून वजन पडत नाही तिचे! एकच माणूस.. बघ हां.. मास्तर.. गुरूजी आणि सर.. काय चित्र राहते डोळ्यांसमोर? तिघेही एकच पण मळक्या टोपीत मास्तर.. बऱ्या सदऱ्या पायजम्यात गुरुजी नि एकदम शर्ट पॅंटीत सर!
तर तुला ढग म्हणायला कारण ही तेच रे.. महाकवीचा संदेश वाहक तो मेघ.. आणि माझ्यासारख्या सामान्याचा तो ढग!
असो.

तर ढगास..,

संदेशवहनाचे कित्येक झाले प्रकार. आजकाल तर सारे काही क्षणार्धात! तेव्हा तुझी कुठली आठवण यायची लोकांना! पण मला तूच हवा आहेस.. अगदी बाय चॉइस! शेवटचे आंग्ल शब्द बघून बिचकू नकोस! आजकाल सारी पोरे हेच शिकतात.. येरे येरे पावसा ऐवजी रेन रेन गो अवे! थोडक्यात काय वातावरण ढगाळ आहे नि तूच हवास हे खरे!
हे लिहितोय तुला खरे पण तुझ्यासाठी नाही ते.. तू तो हमाल भारवाही.. एवढे काम करावेस.. करशील ना?

आषाढस्य प्रथम दिवसे..
तुला पाहिले नि आषाढ नसूनही त्या महाकवीच्या काव्याची आठवण झाली. होणारच ना. ते नभ झाकून टाकणारे काळेभोर ढग. वेगवेगळया आकारातले. सूर्याला झाकोळणारे नि धरतीवर छत्री सारखे पसरलेले. त्या यक्षाला वाटले असणार तूच तो जो त्याच्या प्रियेला संदेश पोहोचवणारा! मेघदूत! तर तू माझेही काम करूनच टाक!
कसले म्हणतोस?

अरे तेच ते..
महाकवी होताच मोठा..महान.. पण माझ्या भावना काही वेगळया असणार आहेत का रे? कालिदासाने तुला दाखवला असेल मार्ग..आणि भुलला असशील त्या शब्दांना.. त्याबद्दल तक्रार नाही माझी. तो कवी होताच महान. त्याच्या शब्दांवर कोणीही मोहित होईल. तसा तू झालासच. पण म्हणून माझ्या सारख्या कवी नसलेल्याचे तू नाही ऐकणार का रे? भले मग संदेश काव्य रूपात नसेल. त्यामागच्या भावना तर सच्च्या आहेत हे खरे.
हे सारे जरातरी काव्यमय झाले. पण का नाही लिहू काव्यात? आमच्यासारख्यांनी सदा सावधान विश्रामाच्या तालावरच राहायला हवे? संगीत वा काव्याच्या तालावर नको?

आता खरी गोष्ट..
या तुम्हा ढगांच्या सान्निध्यातच आम्ही काढतोय आयुष्य. आम्ही म्हणजे मी आणि माझे अजूनही साथी आहेत. तक्रार नाही रे. ते कर्तव्य आमचे. कित्येकदा वाटते.. घर कब आओगे म्हणत कुणी वाट पाहात असणार. कुणी वाटेकडे डोळे लावून पाहात असणार.. चार ओळींच्या पत्राची चार महिने वाट पाहात! मग त्या पत्रात चेहरा पाहून मन रिझवायची सवय झाली आतापर्यंत सगळयांना. झाली म्हणजे झाली असणार.

मी आलो ना इथे..

खरे सांगतो सगळे काही अर्धवट सोडून.. काय झाले सांगतो. सारे काही पार पडले. आमचा गृहप्रवेश झाला. प्रियेचे नि माझे चार दिवस ओळख होण्यातच गेले. नि निघावे लागले मला. गावाकडची ती. माझ्याशी लग्न होऊन आली खरी पण अशी स्वप्ने पाहिली असतील का रे तिने.. चार दिवसांतच नव्या नवरीस नवरा घरात दिसू नये. ज्याच्यासाठी नि ज्याच्या जिवावर माहेरचे  सारे धागे सोडून यायचे तोच नसणार घरात.. तिने कोणाकडे पहावे? सुळावरल्या पोळीची चव प्रियेला अशी इतक्या लवकरच कळून यावी? बरे, बिचारीची अपेक्षा काही फार नसणार. ज्याच्याशी जन्मगाठ बांधली त्याने किमान काही दिवस जवळ राहावे ही काही नव्या नवेल्या नवरीची अपेक्षा फारच मोठी म्हणावी का रे? त्यात सारे सोडताना हे ही ठाऊक तिला की ना सहजी संपर्क होईल न सहज परत येणे. तरी मनावर दगड ठेवून आलो निघून. या गणवेशाने हेच शिकवले रे.

पण आठवण तिची येते.
त्या चार दिवसांत.. गालावर तिच्या खळया पडतात .. मोठे टपोरे मोत्यासारखे डोळे तिचे.. लाजते ना ती जमीन पायाच्या अंगठ्याने उकरत नि पदराशी खेळत.. तिचा लांब केसात हरवण्यास वेळ मिळाला नाही रे.. तिच्या चेहऱ्यावरचे हसू मी निघताना आसूंत बदलले. वाईट नाही वाटत त्याचे पण आठवण तर येतेच ना. खिशातल्या फोटोशी मी किंवा तसबिरीशी तिनेही किती माराव्यात गप्पा?

इथे सारे काही सुनसान.. एकतर ही झाडे..झाडे कसली.. जंगल.. बाजूला घोंघावणारे पाण्याचे प्रवाह.. जोरदार झोंबरा वारा.. दिवस रात्र डोळयांत तेल घालून दिलेला पहारा.. हातातली गन सांभाळत.. मधूनमधून तो गोळीबार.. आणि या साऱ्यांबरोबरच तू.. गावाकडे उंच आसमंतात दिसणारा तू आता माझा सखा सांगाती बनून अगदी जवळ माझ्या असतोस. माझ्या अगदी जवळचा सखा तू.. या इथे चालणाऱ्या गोळयांनंतर जीव जिवात आहे हे तपासून पाहतो मी.. मी माझ्या कर्तव्य बजावण्यात नाही करू शकत कसर. पण तू तर मुक्त आहेस ना.. या उंच उंच पर्वतरांगांवरून निघून तू जाऊ शकशील ना माझ्या गावात.. घेऊन माझा संदेश..

संदेश कसला रे..
नुसती खुशाली कळाली तरी प्रिया आनंदून जाईल.
म्हणावे.. जिथवर मी येत नाही तोवर आसवांना बंदी आहे. डोळयांतले टिपूस पुसणारा नसेल कुणी तर त्या आसवांना काय अर्थ राहिला? आता जेव्हा केव्हा जाईन किंवा जाऊ शकेन तेव्हा सगळया दिवसांची कसर भरून काढेन.
तोवर..
आम्ही ही खिंड लढवतो..

सीमेवरची आघाडी सांभाळत.
नि तू म्हणावे तोवर तिकडे आपली लढाई लढ..
सीमेवर लढत आम्ही असलो ना तरी आमच्याबरोबर तुम्हीही ही लढाई लढतच असता. आमची दिसते सर्वं जगास लढाई.. तुमच्या लढाईस समजणारे मात्र कोणी नाही. संत मंडळी सांगून गेले.. रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग..
आम्ही तर शब्दशः लढतोय इथे पण म्हणावे, तुमची ही लढाई पण तितकीच कठीण आहे. आम्हाला शूर वीराचा दर्जा देणाऱ्याने तुमच्याकडे ही पाहणे गरजेचे आहे. ज्या धीरोदात्तपणे तिने मला निरोप दिला तिचे कौतुक करायला नको का?

मला ठाऊक आहे ढगा, त्या कविराजासारखी काव्यमय नि नितांतसुंदर भाषा माझ्यासारख्या रांगड्या गड्या कडे नाही. पण नीट समजून घेशील तर तुला कळेल.. आतून आलेले शब्द आहेत रे हे. त्यामुळे त्यात सच्चाई आहे. दिलकी पुकार आहेच पण त्याहूनही पुढे जाऊन माझ्या प्रियेची काळजी आहे.. तिच्या आठवणीत भिजलेले हे शब्द आहेत.

माझ्या मित्रा,  तू उन्मुक्त आहेस.. इथून आमचा गाव जरूर दूर आहे पण तुझ्यासारख्या स्वच्छंदीस त्याचे काय. फक्त वारा वाहील तसा वाहून जाऊ नकोस. माझा निरोप घेऊन थेट जा.. तिच्या हातावरली मेंदी अजून निघाली नसेल.. डोळयातले पाणी सरले नसेल.. वाट पाहणे सुरूच असेल. सांग तिला.. प्रिये वाट नको पाहूस.. ही जीवनाची वाट सरायची आहे अशीच वाटेकडे डोळे लावून. त्यापेक्षा समज.. ही खुशाली कळणे म्हणजेच माझे येणे.. आणि माझा हा मेघमित्र आहे ना.. तोवर काळजी नको.. आहेस ना रे तू आणि करशील ना एवढे काम?

करशीलच.. खात्री आहे मला!
तेव्हा ढगा .. आता निघा..
रस्ता दूरचा आहे..
निरोप महत्वाचा आहे..
तेव्हा..
कृपा असू द्यावी.. दयाघन ..
अंबुजा..
मेघा!

... तुझा

# ४

# द मदर्टंग.. माय मराठीस,

हाय!

हौ आर यु?

म्हणजे कशी आहेस?

मी? मी इकडे एकदम डुइंग वेल! हंकी आणि डोरी एकदम! आणि थ्यांक्स हा विचारल्याबद्दल!

तुला लिहायला बसलोय हे पत्र ..

कारण तुझा दिन म्हणजे मराथी डे आहे ना! तो सेलिब्रेट करायलाच पाहिजे की नाही? रियली.. एक डे कसला साजरा करायचा आपल्या भाषेचा.. अख्खे वर्षच नको का करायला? पण तशी पद्धतच पडून गेलीय ना आजकाल.. तर आपणही का मागे रहा?

तर तू जागोजागी भेटतेस तर किती बरे वाटते सांगू? तू सर्व महाराष्ट्रभर आहेस.. राज्याबाहेरही आहेस.. अगदी आऊट ऑफ कंट्री देखील तुझी एंट्री आहे.. एकदम नॅशनल आणि इंटरनॅशनल! तुझा एवढा रिच पाहून किती बरे वाटते सांगू..

इकडे आपल्या स्टेट मध्ये तर कोसाकोसावर तू तुझे रूपडे बदलतेस.. तुझे हे विभ्रम मन मोहवून टाकतात..म्हणजे तू किती ब्यूटीफूल असली पाहिजेस ना! आगरी.. मालवणी पासून ठसक्यातल्या वऱ्हाडी पर्यंत.. तुझा लहेजा बदलतो.. तुझे बाह्यरूप बदलते.. जेवढे बदलेल तेवढी तू अधिकच आकर्षक वाटू लागतेस. तरीही आम्ही प्रमाण म्हणजे स्टॅंडर्ड भाषा कवटाळून बसतो.. बाकीच्यांना कधी ग्राम्य.. कधी मागास मानतो हे खरे. पण तुझी ती बोली रूपेच खरेतर तुला प्रवाही आणि खळाळती ठेवतात. उगाच त्या शहरी भाषेस सुपीरियर ठरवून बाकीच्यांना कमी लेखल्याने तुझेच होते ना लुस्कान.. आय मीन नुकसान? तशी तू पावलोपावली भेटत असतेस खरी. हल्ली पण भेटतेसच. कारण तू महाराष्ट्राची ऑफिशियल लॅंग्वेज आहेस ना! तुझा ते.. काय म्हणतात.. उद्धार करायला सगळेच एकदम एंथु असतात इकडे. उद्धार म्हणजे काय.. एकदम तुला वैभवाच्या शिरी बसवायला! म्हणजे तसे ऐकून आहे मी म्हणून एक सांगतो. नाहीतर तुला वाटेल आम्ही अजिबात बॉदरच नाही करत की काय तुझ्याबद्दल. गव्हर्नमेंट मागून गव्हर्नमेंट तुझी काळजी वाहतात. सगळा कारभार तुझ्याच बरोबर व्हावा.. मग ते अगदी सुंदर

विलोभनीय अशी सरकारी मराठी वापरतात.. अशी जी विद्वानातील विद्वानास पण समजू नये.. बाय द वे.. विद्वान म्हणजे आपले लर्नेड पीपल.. उगाच डाऊट नको मनात म्हणून सांगतो.

तू भेटलीस मला ती जन्मतःच. म्हणजे माझ्या जन्मानंतर तू भेटलीस.. पहिला ट्यँहा भाषातीत असला तरी मग मम्मी आणि डॅडी शिकवतील ती भाषा. ते मराठी म्हणून मी मराठी! कुणी म्हणाले ना.. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी.. तर मी खरंच फॉर्च्युनेट.. मलाही मराठी लॅंग्वेज बोलायला भेटली म्हणून. अगदी लहानपणी तुझ्या भेटीची घराखेरीज दुसरी हमखास जागा म्हणजे ते आमचे स्कूल.. लक बघ ना माझे.. आमच्या वेळी मराठी शाळाही होत्या चक्क! आता तरी पटले ना तुला आमच्या सत्ताधारी वर्गास तुझी केवढी चिंता आहे.. पुढे काय.. ग्लोबलायझेशन! स्कूलास्कूलातून इंग्लिशचे वाघिणीचे फ्लेवर्ड मिल्क बाटल्या भरभरून पाजू लागलेत. त्यात तू जरा बॅकवर्ड राहतेस की काय असा डाऊट येऊन राहिलाय. त्यामुळे आता मराथी स्कूल्स बंद.. अर्थात थर्ड लॅंग्वेज म्हणून तुझी सक्ती करायला विसरले नाहीत हा.. म्हटले ना उगाच गलतफहमी नको की कुणी तुझ्याबद्द्ल बॉदरच करत नाही म्हणून. पुढे कॉलेज.. पण कॉलेजच्या सिलॅबस मध्ये तू इन्क्लूड नव्हतीस. कशी असशील? तू राजभाषा म्हणून कागदावर आहेस.. पण ज्ञानभाषा तर कधी बनू शकशील? तुझ्यात ती पॉवर असेल ही पण.. चिनी लोक मुलींचे पाय बुटात आखडून त्यांची वाढ खुंटवतात.. तशी आमच्या द्रष्ट्या लोकांनी तुझी वाढ खुंटवण्याचा घेतलाय वसा! आणि सांगू एवढे डिटरमीन्ड आहेत ना ते.. एकदा वसा घेतला की कधीच चुकत नाहीत यात!

पण तरी सांगतो तुला..
या सगळ्यांनाच कशाला क्रेडिट तुझ्या या कंडीशन बद्दल? आमचे मराठी पीपल आहेत ना ते पण एक दुसऱ्याशी मराठीत बोलायला अडखळत असतात.. अडखळतात म्हणजे हेझिटेट.. उगाच डाऊट राहायला नको म्हणून सांगतो. गावागावांत तुझी अजून सद्दी चालते पण शहरात मात्र आता तू डाऊनमार्केट होतेस की काय असा डाऊट येतो. आजकाल म्हणून आमचे चिल्ड्रन लोक स्कूलमध्ये जॉनी जॉनी यस पापा शिकतात.. उगाच चल रे भोपळया टुणूक टुणूक वगैरे वाचत बसत नाहीत.. अगदी आजचे श्याम पण आपल्या मम्मीच्या नाकावर टिच्चून हॅरी पॉटरच वाचतात.. श्यामची आईबिई नाही. अजून उदाहरणच द्यावे तर.. मोठमोठ्या मॉल मधून चकचकीत वातावरणात तुझा वापर करायला यांना कसेसे वाटते.. तिथे ते 'हौ मच फॉ दॅट वॉटबॉटल्' असेच पाहिजे.. मग कितीही असो स्वभाषेचा अभिमान! प्रगतीपथावरील महाराष्ट्रातील विमानतळ काय की हे मॉल काय.. विकासपथावर सुसाट सुटलेल्या महाराष्ट्रातील या झगमणाऱ्या भागात डाऊनमार्केट मराथी चालत नाही.. ती चालेल फक्त एसटी स्टॅंडावर.. अशी आपली आपणच घातलेली समजूत आहे मनाची.. त्यामुळे साहित्यात

भले जिंको अगदी बहुभाषिक ऑलिंपिक किंवा अमृताशी पैजा.. अशा ठिकाणी किनई तू ऑड वाटतेस असे वाटत असावे बहुजनांस! परत त्या साहेबाच्या भाषेत बोललो तर एकतर बोलणारा डायरेक्ट हायली एज्युकेटेड आहे हे लगेच कळते नि एक लँग्वेज ऑफ एक्सप्रेशन म्हणून ती सवयीची झालीय ना! थोडक्यात आमचे विचारी जन ही आमच्या सरकारांच्या इतकेच ॲक्टिव्हली विचार करतात तुझ्याबद्दल!

भाषेचा विकास तिच्यामुळे येऊ शकणाऱ्या आर्थिक ताकदीतून होतो म्हणतात.. हुश्श.. किती डिफिकल्ट सेंटेन्स नाही? वाचूनच टेन्स व्हायला होईल! मधे कुठेतरी हे वाचण्यात आले. म्हणजे तू आलीस की तुझ्या मागे जॉब्स येणार का? आधीच ज्ञानभाषा म्हणून तुझी वाढ खुंटवलीय.. तू नोकरीची भाषा होशील.. दिल्ली बहुत दूर है.. तोवर तुला टिकवायला आम्ही कंबर कसून तयार आहोत. कारण तू आमची मायबोली आहेस.. ज्ञानोबाची तुकयाची तू भाषा.. अमृताहूनी गोड हे खरेच. संस्कृत तुझी जननी असेलही .. जननी म्हणजे.. आजच्या लिंगोत मॉम.. तू अमृताशी पैजा जिंकशील.. तशी तुझ्यात कॅपॅबिलिटी आहे.. नो डाऊट.. पण तुला तो तसा चान्स मिळाला तर ना? खरे तर आम्ही तो दिला तर!

तर माय मराठी,
तुझ्या उन्नतीचे सारे प्रयत्न आम्ही करणारच पण!
तुझा भूतकाळ तर उज्वल होताच.. वर्तमान सामोरी आहेच.. त्याबद्दल काय सांगणार..?
आणि फ्युचर? त्याबद्दलही काय सांगणार?
तुझी ओढ आहे..
तुझ्याबद्दल माया नि प्रेम आहे ..
ते टिकावे..
माझ्या मायभाषेबद्दलची ही ओढ..
काही प्रमाणात खरीतर कुतरओढ..
तिचे काय..
आणि तू दिसतेस..
सरकार दरबारी लक्तरे नेसून राज्यभाषा बनण्याची आतुरतेने वाट पाहणारी माझी माय!
मोठ्या मोठ्या प्रतिभावंत लेखक नि कवींच्या अजरामर लेखणीतून झिरपलेली माझी माय!
तुझ्या छटा किती सांगाव्यात!
तान्हुल्या बोबड्या मराठीतही तुझा नाद खुळावतो..
तशीच वाकवावी तसे वाकेल भाषा म्हणून वाकवणाऱ्या लेखकाची भाषाही खुणावते.

कित्येकांनी कालातीत ग्रंथसंपदा निर्माण केली तुझाच वापर करून. काव्ये.. महाकाव्ये लिहिलीत.. अजरामर नाटके लिहिलीत..
तुझा अभिमान बाळगावा तितका कमीच..
तेव्हा
आम्ही किती प्राऊड फील करतो किंवा वुई आर प्राऊड ऑफ यू हे सांगण्यासाठीच हा पत्रप्रपंच!

आणि तुझी आमच्याकडून उन्नती होईल तेव्हा होवो..रादर आम्ही होऊ देवू तेव्हा होईलच ती..
आम्हाला तुझी किंमत कळेल तेव्हा कळो..
तोपर्यंत..
आहेत आमची गाणी..
गर्व गीते.. महाराष्ट्र गीते.. मराठी गीते.. तुझे पर्सेंटेज म्हणजे टक्का घसरला तरी बेहत्तर..
तुझे गर्व गीत आम्ही गायल्यावाचून राहत नाही.

तुला वैभवाच्या शिखरावर बसवायची आम्ही ओथ मराठीदिनी मराठीतूनच घेतो..
अगदी सीरियसली!

तुझाच..

# ५

# माझ्या प्रिय बालपणा,

तसा तू आठवत असतोस मधूनमधून.. पण खरे तर आता त्यासाठी पण नाही वेळ मिळत. भेटला असतास तर कडकडून असतो भेटलो .. पण..

काल तू भेटलास माझ्या बाळाच्या बाळमुठीत.. तो शांत झोपलेला.. त्याच्या मुठीत घेऊन त्याने आणलेली नवीन खेळण्यातली छोटीशी गाडी. काल तो झोपणारही नव्हता त्या गाडीशी खेळण्यासाठी. पण शेवटी त्या निद्रादेवीच्या कुशीत गेलाच झोपून गाढ. त्याच्या त्या बंद डोळ्यांआड तो स्वप्नात रंगला असणार. त्याची ती मूठ उघडून ती गाडी घेताना थोडासा झाला जागा पण परत गाढ झोपून गेला त्याच्या आईच्या कुशीत.. तसाच तू माझ्यासाठीही होतास रे.. आता तूही नाहीस.. तुझे काय कालानुसार तू जाणारच होतास.. तसा गेलास.. आणि माझी आई.. तीही नाही आता.. तिच्या कुशीची ऊब नाही आणि तुझ्या आठवणीशिवाय काही उरले नाही.. पण मी सुदैवी रे.. किती आनंद दिलास तू मला. आज माझ्या बाळाच्या चेहऱ्यावर दिसतो तसा निखळ निर्व्याज आनंद.. त्याची तुलना अजून कशाशी करणार?

पण गंमत सांगतो.. तू होतास ना तेव्हा वाटायचे.. कधी एकदा तू जाशील नि मोठेपण येईल .. मोठ्यावयात आईला न विचारता चॉकलेट नि आईस्क्रीम घेण्याच्या बदल्यात मी तुला सोडायला होतो तयार! तरी तेव्हा तू आवडायचास हे आज जाणवतेच.. आईचे बोट धरून शाळेत जाताना मागे बघत बघत जाणाऱ्यायेणाऱ्या गाड्यांची गंमत.. आई डब्यात द्यायची त्या आवडत्या  पोळयांच्या तुपाने पचपचीत गूळ टाकून केलेल्या लाडवांची गंमत नि वाढदिवसाच्या दिवशी करायची त्या गुळाच्या शिऱ्याची गंमत.. बाबा मूड आला की खेळायचे बॅट बॉल .. त्यांना माझ्याबरोबर कधीच जिंकता यायचे नाही.. आज मी माझ्या धाकल्याबरोबर ठरवून कसा हरतो .. ते आज जाणवते.. त्यांच्या बरोबर गणपती पहायला घेऊन जाताना हक्काने खांद्यावर बसायचो मी.. ते खांदे दुखू शकतात याची कधी जाणीवही व्हायची नाही.. नि ते करूनही द्यायचे नाहीत.. मग कधी पकडापकडी.. यात ही अर्थातच जिंकायचो तो मीच.. कधी कॅरम.. त्यात हरण्यास किती मेहनत करावी लागत असेल ते आज मुलाशी खेळताना जाणवते. अजून त्या तुझ्या आठवणी कालच सारे घडल्यासारख्या  ताज्या आहेत रे.. अजून वाटते त्या

तुझ्या छायेत जावे पण आता तू भले येशील पण आणू शकशील का माझ्या स्वर्गस्थ आईबाबांस.. आणि ते नसतील तर तुझा उपयोगच काय?

पण तसा तू साळसूद होतास.. खेळायला द्यायचास कधी मनमुराद.. कधी थोडेफार.. पण त्या बदल्यात आपली किंमत वसूल करायला नाही विसरायचास.. अभ्यासाचे ओझे बाळगत काढावे लागले ना दिवस की कसा तुझा राग राग यायचा.. इथे आई बाबा काका मामा.. सारे मोठे मारे बाता मारताहेत अभ्यासाच्या पण स्वत: कधी बसलेत अभ्यासास.. नाव नको! आज माझ्या पोराला पाहतो ना अभ्यासाची टाळाटाळ करताना तेव्हा तू आठवतोसच..

बाकी तसा तू होतास तर ती शाळा होती.. शाळेतली मज्जा होती.. चित्रकलेचा तास होता.. आठवड्यात वाट पाहून पाहून येणारे पीटीचे पिरियड्स होते..वर्षात एकदा येणाऱ्या शाळेच्या सहली नि गाणी नि नाटकांचे शाळेतले गॅदरिंग.. वर्षभर वाट पाहून येणारा स्पोर्ट्स डे.. नि गळयात लटकावून आलेला मी.. दोन चार खेळात मिळवलेली पदके.. आणि फक्त त्याचवेळी शाळेत मिळणारे बटाटेवडे ..

मग दिवाळी.. ते फटाके नि रोषणाई.. बाकी गंभीर असणारी माझी आई तेव्हा दिसायची हसताना.. खरे सांगतो दिवाळी म्हणून मला जास्तच आवडायला लागायची.. मग दिवाळीत बाबा बसायचे कंदिल बनवत.. त्यात माझी लुडबुड असायची.. रांगोळया काढताना रंगात बरबटलेले हात .. नि ते पुसून खराब केलेला नवा सदरा.. अगदी काल घडल्यासारखे आठवतेय मला.. या साऱ्याचा साक्षीदार होतास तो तूच..
गणपतीच्या दिवसांत बाबांचे बोट धरुन पाहिलेले ये मंडप.. नवरात्रीत रात्र जागवून एखाद दिवस खेळलेला गरबा.. रोज हवा म्हणून हट्ट.. जो कधी त्या सकाळच्या शाळेमुळे मंजूर व्हायचाच नाही कधी.. तेव्हा आलेला तुझा राग अजून आठवतो.. तसे रोज संध्याकाळी आई भर खेळातून मैदानातून उचलून आणायची ना तेव्हा वाटायचे.. तू गेलास नि मी मोठा झालो की खेळेन मनसोक्त..
अजून आठवते होळी.. आई ताकीद देऊनच पाठवायची ना.. एका तासात घरी येण्याची.. नाहीतर सर्दी व्हायची मला म्हणे.. तेव्हा छान छोटे.. वाईट मोठे वाटून जायचे ते तुलाही असेल आठवत.
तसा तुला खोडकरपणाही असेल रे आठवत.. झाडावर चढून काढलेल्या कैऱ्या.. नि पेरू.. दगड मारून पाडलेली जांभळे.. सायकल शिकताना फोडून घेतलेली ढोपरे नि नंतर त्याच सायकलीवरून लांब लांब मारलेल्या रपेटी .. घाबरून पाण्यापासून दूर राहात टाळलेले पोहायला शिकणे नि बाबांनी पोटाला धरून घडवलेली पाण्यातली सैर.. काय काय आठवते तुला आठवताना.. एकदा आठवते तुला.. आजारी पडलेलो मी.. किती मौज वाटलेली कारण

आजारी पडलो की आई  कधीच ओरडायची नाही.. एरव्ही स्वतःच्या हाताने खा म्हणणारे बाबा उशाशी बसून स्वतः खाऊ घालायचे मऊ आणि ऊन ऊन वरणभात तेव्हा तुझे कौतुक वाटल्यावाचून राहायचे नाही.. त्यात परत जाता येता आई कपाळावर हात ठेवून ताप पहायची ना.. वाटायचे असाच पडून रहावा .. नि .. मग हळूच एकेका खेळाची यायची आठवण.. नि कधी एकदा ताप निघून जातो असे व्हायचे..

तसा तू साधासरळ मात्र नव्हतास रे.. कधी मारकुट्या शिक्षकाच्या हातून पट्टीचा मार खाऊ घालायचास कधी एखाद्या पेपरात लाल लाल खुणांनी घरी बाबांच्या ओरड्याची भीती घालायचास..
तू चांगला होतास तेवढाच वाईट आहेस असे  वाटायला लावायचास अशा वेळी..

तू आठवलास की त्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या आठवतात..भर दुपारच्या त्या क्रिकेट मॅचेस नि तलावात सूर मारत पोहोणे.. दुपारी मांडलेले पत्त्यांचे नि कॅरमचे डाव.. कधी मूड लागला तर वाचलेली पुस्तके नि त्यातही शिवाजीमहाराजांच्या चरित्राची पारायणे.. थकून भागून सुट्टीच्या दिवसांत मग रात्री आकाशातल्या चांदण्या मोजत गच्चीवर झोपणे.. त्याआधी लावलेल्या गाण्यांच्या भेंड्या.. सुट्टी संपत आली की जीव कसा कसानुसा व्हायचा रे तेव्हा.. आणि दुसरीकडे शाळेतले मित्र परत भेटण्याची आतुरता ही.. मग मस्त नवीन पुस्तकाचा वास घेत .. मराठीच्या पुस्तकातल्या सगळया वाचून काढलेल्या गोष्टी.. काय काय आठवावे..

आज आठवलास तू माझ्या बाळाच्या बाळमुठीमुळे.. बाळमूठच ती..काय आणि किती घट्ट पकडणार.. मुठीतल्या वाळू सारखा तू निसटलास.. जाताना ती रेती कसा मऊ मुलायम स्पर्श सोडून जाते तसा गेलास.. आठवतोस तू नि त्याबरोबरच ते सोनेरी दिवस.. आणि त्याहूनही कातर वेळी कधी हुरहूर लावणाऱ्या त्या आईबाबांच्या गोड आठवणी..

किती रे गोड होतास तू?
आठवले की जीव कसा जुन्या जमान्यात पोहोचतो.. तू किती सुंदर होतास..
पण आज मोठा झाल्यावर आजूबाजूला पाहतो ना तेव्हा अजून काही जाणवते.. रम्य ते बालपण.. असे मला साऱ्याच बाळांसाठी म्हणता आले असते तर? ज्या जीवनाचा तू पाया आहेस तोच साऱ्यांसाठी असा का असू नये..काही बाळे जन्मजात अशी का असावीत की त्यांना ते बाळपणचे सारे सुख मिळू नये? कुणी हातीपायी धड निपजत नाही.. कुणी मेंदूतून अधू जन्मतो.. कुणाला तू येताजाता आजारी पाडतोस.. नि बालपणाच्या साध्या साध्या आनंदांना

मुकवतोस.. याहून ही भयंकर तर काहींना तू त्यांची आई किंवा बाबा यांच्यापासून ही दुरावून ठेवतोस.. काही हातीपायी धड असतील त्यांना गरीबीच्या चक्कीत दळून काढतोस नि ते मग शाळा वगैरे विसरून मेहनतीमागे लागतात.. जगण्यासाठी नि नुसते तगण्यासाठी संघर्ष त्यांना या वयातच  करायला लावतोस..

आयुष्यात तू एकदाच येतोस.. आणि आयुष्यभराची नांदी गाऊन जातोस.. माझ्यासाठी ती आनंदाची होती हे तुझे उपकार.. एखाद्या गोष्टीचा setting the tone म्हणतात ना तसा तू माझ्यासाठी केलास. आजच्या माझ्या आनंदाचा पाया तू आहेस.. तसाच सगळया छोट्या बालकांसाठी होशील ना तू? म्हणजे मग कोणी अनाथ नसेल .. कुणी जन्मजात बौद्धिक वा शारीरिक व्यंग घेऊन आलेला नसेल.. कुणी जगण्याच्याच संघर्षात कोवळया वयातच गुंतलेला नसेल..

तसे तुझ्या हातात काय आहे.. आपण फक्त सर्वे संतु निरामय: एवढी इच्छा करायची आणि त्यात प्रत्येक बालक- बालिकेस एक अत्यंत आनंदी बाळपण लाभो एवढी इच्छा करायची आणि काय? आता तुझी भेट तर तशी डायरेक्ट नाही होणार कधी ...पण माझ्या तान्हुल्या-सोनुल्याच्या चिमुकल्या पावलांत नि मिटलेल्या पापण्यांनी स्वप्ने पाहणाऱ्या नेत्रांत तू परत दिसतोयस.. खरेच.. आता तरी लवकर नको जाऊस.. तो मोठा होईल तसे तुझे विभ्रम अजून मी पाहिनच.. आणि त्या माझ्या दुसऱ्या बालपणात हरवूनही  जाईन..

बरंय..
भेटू.. जमेल तसे..

तुझाच.

# ६

# प्रिय रूपयास,

तुला लिहायला बसलो.. रागावू नकोस .. पहिले पत्र तुला नाही म्हणून.. इथे कितवाही लागला नंबर तुझा तरी सर्वांना माहिती आहे तूच सर्वात मोठा!
तू सबसे बडा रुपय्या!

येरे येरे पावसा म्हणून लहानपणी दिला मी पैसा.. मधून मधून भेट व्हायची तेव्हा.. हट्ट केला की आई म्हणायची.. बिलकूल काही मिळणार नाही.. पैसे काय झाडाला लागतात काय! तेव्हा तू झाडाला लागत नाहीस एवढे समजलो मी.. तेव्हापासून तू मागेच पडलास.. आणि सर्वांच्याच मागे पडतोस तू .. असा की, कळायला लागले त्यानंतर हे कळले की तुझ्यावाचून काहीच शक्य नाही या जगात.. आणि तू आमच्या मागे पडलास म्हणून पडले सगळे जग तुझ्या मागे! तो लहानपणीचा पैसा.. झाला असेल खोटा कवितेत पण खोट्या पैशानी खऱ्या पैशाचे सोंग नाही आणता येत. खरेतर कशानेच आणता येत नाही तुझे सोंग.. म्हणजे तू एक जागतिक सत्य आणि तुझे सोंग आणता येत नाही हेही  दुसरे जागतिक सत्य.

विचार केला तर वाटते की तू विनिमयाचे साधन आहेस एक. तू आला असणार जगात एक सोय म्हणून.. लोकांना देवघेव करता यावी म्हणून तुझा जन्म झाला असणार.. पण पुढे नाकापेक्षा मोती जड व्हावा तसा डोक्यावर बसलास चढून तू. खरेतर चूक तुझी नाही.. तू इंग्लिश मध्ये म्हणतात ना तसा.. necessary evil आहेस. तुझ्याशिवाय जगरहाटी चालणे अशक्य. तुझी ताकद मोठी.. ज्यांच्याकडे तू आहेस.. ते मोठे लोक.. ज्यांच्या कडे नाहीस ते दीन.. आहे रे आणि नाही रे .. किती साध्या व्याख्या आहेत ना.. तुझ्यामुळे! म्हणून मग मोठे होण्यासाठी सारे लागलेत तुझ्यामागे. पण सारेच तसे नाहीत.. संत सांगून गेले.. जोडोनिया धन उत्तम व्यवहारे.. तसे कित्येक करतात.. आणि काही..फक्त तुझाच विचार करतात.. दिनरात.. मग तू कसा का येईनास.. व्यवहार उत्तम असो की नसो.. पुढे कित्येकांनी तर तुला साधन बनवण्याऐवजी साध्य बनवले.. तुझी ताकद अफाट आहे हे ओळखून तुझ्या मागे लागले.. तुझ्यामुळे कित्येकजण  मोठे झाले.. म्हणजे मोठे आणि प्रतिष्ठित. तुझ्याशिवाय गती नाही.. मती नाही.. इतकी की आपल्या निर्मात्या देवास ही हे स्वनिर्मित पैसाच देऊ करतात.. नवस  म्हणा की लालूच म्हणा.. त्या नावाखाली! थोडक्यात त्या सर्वशक्तिमान विधात्याहून कदाचित तू जास्त ताकदवान आहेस.

कदाचित म्हणावे .. कारण एक तो मृत्यू आहे ज्यास तू नाही अजूनतरी खरेदी करू शकलास.. नाहीतर अमर्त्य मानव तुझ्या बळावर अमर झाला असता! आणि एखादी 'शेवट नसलेली गोष्ट' लिहून बसला असता. कित्येक जणांची आयुष्ये तू घडवलीस .. किंवा बिघडवलीसही. बिघडवण्यात ही तू मागे नसतोस.. कुणा सोने आणि नाणे मृत्तिकेसमान मानणाऱ्यास संतपदावर पोहोचवू शकतोस तू.. तर कुणाच्या चारित्र्याची वाट लावणाराही तूच असू शकतोस..

तुझी ताकद म्हणजे.. तू काय नाही करू शकत..? बहुतेक गोष्टी तुझ्यापर्यंत येऊन थांबतात. नाही तर अडखळतात.. तू हात दाखवलास की मगच जातात पुढे.. तू असलास की माणूस श्रीमंत गणला जातो.. तू असलास की एखादा देश बलाढ्य मानला जातो.. तू नसल्याने काही लोक तिसऱ्या जगात गणले जातात. तू आलास की मान मरातब आला.. प्रतिष्ठा आली.. सर्व जगभरात कित्येक विविध भाषा बोलल्या जात असोत.. तुझी भाषा ही सर्व जगाला कळणारी एकमेव भाषा आहे . तू असलास की सारे सोपे सरळ.. तू नसलास की विपन्नावस्था.. किती साधे सरळ वर्गीकरण होते ना जगात तुझ्यामुळे. फार काय.. जे तुझ्या मागे लागत नाहीत ते साधे सरळ.. सज्जन! आणि फक्त तुझाच विचार करणारे येन केन प्रकारेण.. ते लालची नि लोभी.. प्रामाणिकतेच्या व्याख्या पण फिरतात तुझ्याच अवतीभवती..नीतीनियम फिरतात तेही तुझ्याभोवती.. एखादा कामात उत्तम असेल तर तो म्हणवतो.. खणखणीत बंदा रूपया.. आणि तोच जर कुठे चुकत असेल तर .. आपलेच नाणे खोटे! तुला वाटून टाकणारा दानी म्हणवतो आणि तुझा उत्तम वापर करणारा अर्थज्ञानी. या उलट तुला चिकटून बसणारा कवडीचुंबक.. चमडी जाय पर दमडी न जाय म्हणवणारा!

तुझी रूपे अनेक.. सुवर्णमुद्रांच्या रुपातला तू.. पुढे काय.. कसली कसली नाणी आली.. त्यांची नावे बदलली..कवडी तू.. दमडी ही तूच आणि कपर्दिकही तूच.. आण्याच्या नाण्यातला तू, पुढे झालास कागदी रुपया! लक्ष्मीची वेगवेगळी रूपे सगळी! तिला आम्ही देवता मानतो.. तिची पूजा आलीच करणे मागोमाग. कित्येक राखतात तिचा मान पण कित्येक विधिनिषेध न बाळगता लागलात लक्ष्मी संचयाकडे. इतिहासात तू दिसतोस.. तुझ्यामुळे इतिहास घडवला किंवा बदलला गेलाय.. तू कित्येक राज्ये उद्ध्वस्त करण्यास कारण झालास.. कित्येक राज्ये तू होतास म्हणून समृद्ध झाली.. अगदी इतिहासातले वैभवशाली राज्य म्हणून एखाद्या राज्याचे वर्णन येते तेव्हाही समृद्धी तुझ्यातच मोजली जाते आणि एखादे कंगाल राज्य.. त्याचे दारिद्र्यही मोजले जाते ते तुझ्याच नसण्याने! तेव्हाची फंदफितुरी आणि आजच्या जमान्यातील लाचखोरी हे देखील तुझ्याच माध्यमातून होत आलेय.. नि होत राहिल. हा भूतकाळ किंवा इतिहास आणि

वर्तमानकाळ पाहून वाटते.. तू म्हणजे जगातील एकमेव सत्य आहेस.. आणि भविष्यातही तसाच राहशील..

सबसे बडा रुपय्या म्हणणारा कवी सत्याच्या किती जवळ आहे नाही? वाचायला हे साधे.. म्हणजे लालित्यपूर्ण नसेलही पण सत्य ललित भाषेतच सत्य असते असे थोडीच आहे.. सत्य नेहमी सत्यच असते हेच सत्य! तू हवा आहेसच सर्वांना.. तू आहेस तर सुखसोयी आहेत.. तू किमान एका डिग्निटीने जगण्याची सोय करून देतोस.. तुझ्यामुळे सुखसोयी मिळवता येतात.. जास्तच असलास हातात तर चैन.. आणि ऐशोआरामही. तू नसल्यास कुत्रा हाल खाणार नाही असली अवस्था आणून सोडतोस. पण तुझी गंमत अशी की फक्त तू आहेस म्हणून ज्याच्याकडे तू असशील तो सुखी असेलच असे नाही सांगता येत. तू ती ग्यारंटी नाही देऊ शकत.. बाकी काही तुझ्याने विकत घेता येईल पण तुझा वापर करून सुखी माणसाचा सदरा विकत घेता येईलच असे नाही..!
सर्वांस प्रिय तू .. जास्त आलास हातात की डोक्यात हवा गेल्यासारखे वागायला लावू शकतोस.. हाती घबाड आले की नीयत बदलू शकते.. तू हवास.. किमान गरजा भागवण्यासाठी.. पण असा ही नको येऊस की माणूस म्हणून जीवनच जगणे कठीण होऊन बसावे.. किंवा तसे होऊ नये असा विचार करण्याची शक्ती तरी तुझ्या बरोबरच येवो.. तू येशील जाशील.. पण एखादा बरोबरचा माणूस .. त्याला तुझ्यामुळे दुखावले जाऊ नये एवढीच इच्छा..
कारण तू हाती आलास की भल्याभल्यांची मती बिघडते.. भल्याभल्यांना तुझ्या बळावर स्वर्ग दोन बोटे उरतो..
स्वतःस श्रेष्ठ समजतात कित्येक तुझ्या बळावर..
अगदी देवाच्या खालोखाल!
तसे काही होऊ नये हे महत्त्वाचे..
तुझ्या इतकेच!
तू जगण्याचे साधन बनून रहा..
सर्वांना समान नसलास तरी किमान प्रमाणात मिळत रहा..
हे जग सुखी-समाधानी आणि समृद्ध करण्यातला तुझा वाटा तू उचलत रहा.. आणि काय लिहू?

तुला हे पत्र लिहून बरे वाटले..
हे जर पोष्टात टाकावे म्हटलेना..
तरी त्यावरही तुझीच दक्षिणा लागेल..स्टॅम्पच्या रूपात.. आहे की नाही गंमत..
तेव्हा पाठवत नाही पोष्टाने.. तेवढीच बचत.. तुझीच!

तर बरंय.. भेटत रहा बरे असाच!
तुझाच..

७

# उल्ट्या चष्म्यास,

तू डोळयांवर चढलास कधी ते आठवत नाही.. पण  कानामागून येऊन तिखट झालास तू.. अर्थात हे म्हणण्यापुरते.. तू काही आला नाहीस कानामागून.. खराखुरा चष्मा..  म्हणजे चाळीशी .. चढतो चाळीशीत त्याच्या आधीच तू डोळयांवर चढून बसलास हे खरे..आणि तो ही कसा.. की तो सुलटा चष्मा काहीही दाखवो, तू मात्र त्यातल्या नि त्या मागच्या गंमतीच दाखवण्यात मश्गुल असतोस..

मुळात तू आहेसच एखाद्या खोडकर लहान मुलासारखा.
म्हणजे आठवते मला ..
इकडे वर्गात बाई मारे शिकवत असोत.. भूमितीतील प्रमेय आणि सिद्धता .. तू मागच्या बेंच वर ती दोघे जणू कोणी मुलगा मुलगी आहेत अशी चित्रे काढण्यात दंग असतोस. हे तर त्या शाळेतल्या दिवसांतले.. तर पुढे तर काय.. चेकाळलासच तू.. तू तुझा दबदबा अजूनच वाढवलास.. सारे सुलटे उलटे करून दाखवण्याची तुला असली हौस..कॉलेजात काय नि त्यानंतर काय तुझ्या नजरेतून काही सरळसोट निसटेल तर शपथ.. विदूषकाने खाली डोके वर पाय करून पहावे तसा तू सगळीकडे पाहात बसतोस. मिश्किल नजरेने.
पण त्यात एखाद्यास विदूषकाप्रमाणे हसवण्याचीच तुला हौस आहे म्हणावे तर कित्येकदा तू ज्या पध्दतीने पाहतोस ते मूळ गोष्टीहून ही जास्त गंभीर वाटायला लावतोस. तशी खोडच आहे रे तुझी!
तू उलटा आहेसच .. पण म्हणून सरळ तुला काही दिसत नाहीच की तुला तसे बघायचेच नसते?

तू चढलास डोळयांवर नि अगदी गेलास हाताबाहेर.. म्हणजे तुझ्यावर कसलास कंट्रोल ठेवू देत नाहीस तू तो घालणाऱ्याला. साध्या साध्या पेपरातल्या बातम्या.. पण तू उलट्या वाचायला लावतोस. मग एखादा मंत्री कुठे उशीरा.. तसा मंत्रीवर्ग कुठे वेळेवर पोहोचला तर खरेतर यावयास पाहिजे बातमी.. ( ही तुझीच शिकवण बरे ) .. तर त्याच्यामागचे कारण तू तुझ्या नजरेने शोधून काढतोस. अजून उदाहरणच द्यायचे तर.. कुठे एखादे सार्वजनिक काम झाले बिनबोभाट तर तुला चेव चढतो.. म्हणजे बघ ना .. एकदा तू म्हणालेलास.. शंभर कोटींहून जास्त रकमेची अफरातफर झाली तरच त्याला घोटाळयाचा कॅबिनेट दर्जा द्या! किंवा .. एखाद्या

मंत्र्यासंत्र्याच्या बोलण्यातला अर्थ नि अनर्थ तू काढण्यात वाकबगार! अर्थात तू काही फक्त राजकारण्यांनाच असा पाहतोस असे नाही.. ती जमात तुझ्या आवडीची खास हे खरे .. कारण कथनी आणि करणी मध्ये फरक दिसला की तुझी तिथे उडी ठरलेली..पण सामाजिक .. नि व्यक्तिगतही.. जीवनातल्या विसंगती तुझ्या नजरेतून सुटत नाहीत. तुला अशी सवयच आहे.. सवय कसली खोड म्हणावी.. बातमी मागची बातमी पहायची तुझी खोड.. जित्याचीच म्हणायला पाहिजे.. कारण इतके वर्षे चिकटून राहिलायस..डोळयांवर .. तो काही मेल्याशिवाय निघायचा नाहीस. मेल्यावरच काय .. नंतर ही निघशील का? वर जाताना खाली हाथ जाएगा म्हणतात.. पण तो उल्टा चष्मा घेऊन जाणार का.. किंवा इकडे सोडून जावे लागेल का.. कुणास ठाऊक? की वरती नेता येत असेल तर परत तिकडे ही हेच.. नारदमुनींसारखे कळ लावणे?

तसा तू जगभर प्रसिद्ध आहेस.. मोठमोठ्या व्यंगचित्रकारांचा तू सहचर.. कित्येक लेखकांनी नि कवींनी देखील तुला डोळयावर वागवले नि लेखणीवर मिरवले. लोकांनी त्या सर्वांना डोक्यावर घेतले. कारण ते प्रतिभावंत होते. त्यांना तुझ्यातून पाहताना एक अलगच दिसायची ही दुनिया. कदाचित जगाचे खरे स्वरूप त्यांना दाखवायचे तर असेल पण खरीखुरी दुनिया कोणी पाहिल का दिसली विद्रूप तर? मग ते तिला तुझ्या नजरेने पाहात विनोदाच्या वेष्टनात सादर करत असावेत. सर्वांना अंतर्मुख करवण्याची तुझी ताकद हे खरेच! कदाचित जग बदलून टाकण्यासाठी ते तुझ्यातून पाहात असतील.. नव्हे.. तसेच असणार ते.. पण खरे सांगतो..
जग पूर्णपणे बदलवण्याची ताकद तुझ्यात नसेलही पण तुझा उद्देश मात्र तसा असतोच. उगाच कुणाच्या उखाळया पाखाळया काढण्याचा तुझा स्वभाव नाही..फक्त शालजोडी आपले आवडते वस्त्र असल्यासारखा तू वागतोस.
असे असले तरी जग बदलून टाकायची तुझी इच्छा समजते रे मला..
पण ते असे बदलेल..?
कोणास ठाऊक..

कदाचित तूच खरा असशील.. बदल अकस्मात आणि बाहेरच फक्त झाला तर टिकत नाही..अगदी आत.. मूळ स्वभावात झाला तर टिकून राहिल.. असे तुझे तर्कशास्त्र असावे.. उलट्या चष्म्यातून पाहत कोणासही अंतर्मुख करावे हा तुझा असेल अंतस्थ हेतू.. बदल कसा एखाद्या व्यक्तीत झिरपत गेला पाहिजे नि मुरला पाहिजे.. 'जग बदल घालून घाव' हे तुझे ही तत्वज्ञान.. पण घाव घालण्याच्याही पध्दती असतात ना! काही एक घाव दोन तुकडे करतात..

काही तेच काम हळूहळू करतात.. तर तू 'सौ सुनार की' मध्ये विश्वास ठेवतोस असे वाटते मला.  एक लोहार एखाद्या घावात सारे बदलेल ही,  पण एखाद्याची विचारशक्ती अशी एकाएकी नाही बदलत तिला हळूहळूच आकार द्यावा लागतो..
विचार केला की वाटते लोहाराचा हातोडा सरळ नि दृश्य परिणाम घडवतो.. नि तू अदृश्य असा. दोघे जरूरी आहेत या समाजस्वास्थ्यासाठी. पण तुला नुसताच विनोद आणि उपरोध समजून तुझाच उपहास करतात कित्येकजण!  अर्थात तू या पलिकडचा आहेस. किंवा आधी म्हटले ना तसा जित्याची खोड तू.. काही केल्या डोळयांवरून उतरायचा नाहीस.

तशी तुझी रूपे कितीक आहेत..
कधी निखळ विनोद.. कधी उपरोधिक तर कधी मार्मिक.. कधी नुसत्याच टपल्या मारत पुढे तर कधी कोपरखळ्या मारणारा.. कधी कोणास समजणारही नाही अशा साळसूदपणे तू येतोस.. कोणास वाटेल किती भोळा रे तू .. पण तुझ्यासारखा तूच एक ..
तुझी असली ही रूपे मनमोहून टाकतात. त्यातून कधी तू निखळ हसवतोस. तू गालावर हास्य फुलवतोस हलकेच.. कधी खुदुखुदू..कधी बोचरा असतोस तर कधी काटेरी..  कधी अंतर्मुख करवतोस.. कधी स्वतःच्याच मूर्खपणाची जाणीव करून देतोस. आणि कधीतर तू आल्याचे जाणवू नये इतका subtle असतोस तू.

पण खरे सांगतो .. खरा चष्मा दृष्टी सुधारत असेल पण तू नजर देतोस.. त्यामुळेच असणार.. तू मला आवडतोस फार.. तुझे कौतुक किती करावे? तू आहेस म्हणून हे जग किती वेगळे वाटते नाहीतर तेच ते अन तेच ते बघत कसे कंटाळवाणे झाले असते सारे. त्याच त्या नीरस नि काहीशा दुष्ट अशा दुनियेत तू चेहऱ्यावर चार रेषा हास्याच्या फुलवून जातोस.. कधी हिरवळीसारखा वाटतोस पण कित्येकदा मृगजळासारखा आहेस तू हे जाणवूनही हवाहवासा वाटतोस.
आलास तू तसाच रहा.. राहशीलच हे माहिती आहे कारण म्हटले ना .. जित्याची खोड.. आणि एकदा का तुझ्यातून जग बघायची झाली ना सवय की बाकी काही दिसायचे नाही..

खरे तर तुला उलटा म्हणणे किती योग्य याचीच शंका येते मला कित्येकदा. तू भलेही उलटा राहात असशील वटवाघळासारखा.. पण तुझी दृष्टी मात्र जास्तच आरपार आहे. तुला जे दिसते ते इतरांना सुलट्या चष्म्यानी दिसेल का..? नाहीच दिसत. विसंगती आणि उपरोध हा तुझ्या अस्तित्वाचा पाया आहे.. तू त्यामुळे अमर आहेस.. जोवर विसंगतीचा पूरेपूर स्टॉक पुरवणारे आहेत तोवर तू आणि तुझा उपरोध ही असणारच. आणि बोले तैसा न चाले ही तर माणसाची

खासियत.. त्यामुळे तुला मोकळे रान मिळणार नि तू तुझ्या खाली डोके वर पाय या ब्रीदास जागत धुमाकूळ घालणारच!
अजून काय लिहू? तू आहेसच.. असाच राहशील.. आणि रहाच.. म्हणजे हे जग सुसह्य होईल.. तुला ही ते ठाऊक आहेच!

चल , आता माझ्या या लिहिण्यातल्याच  काही विसंगती शोधून वर तू काही टपली मारण्याआधी ..
बाय बाय..

तुझाच

# ८

# प्रिय विनोदास,

हा! हा! हा! हा!
भेटलास आता .. बरे वाटले रे..
काय आहे ना .. वय वाढले नि लोकांच्या अपेक्षा बदलल्या.. नि मी एक प्रोफेशनल.. त्यामुळे तुझ्यापासून दूर आणि गंभीरतेनेच राहायची अपेक्षा करतात सारे.. मग हसणे आता दुर्मीळ होत चाललेले.. पण आज या पत्रानिमित्ताने आठवण आली तुझी आणि जीव हलका हलका झाला.

तू म्हणजे जिवाचा विसावा..
पण नाही..
तुझ्याहून ते लांब चेहरावाले गंभीर नि ओढून ताणूनही का होईना गांभीर्याचा आव आणणारे दुढ्ढाचार्य स्वतःला मोठे समजतात. का तुझ्याहून तो गंभीरपणा मोठा? का तू सर्वांना असा हलका वाटावास? गहन नि गंभीर म्हणजेच काही मोठे.. अगदी उदात्त .. असे का व्हावे? मान्य आहे की जीवन ही एक गंभीर गोष्ट आहे.. पण तू काही एक थिल्लर थोडीच आहेस? का तुझ्याकडे अशा नजरेने कुणी पहावे?

अगदी लहानपणी तुला दात काढणे म्हणून हिणवायचे.. मोठेपणी तू दिसलास की तुझाच उल्लेख उपरोधाने करणारे लोक खूप आहेत. करोत बापडे! तुझी किंमत काही थिल्लर पणात ही करू धजतात तेव्हाही आश्चर्य वाटत राहते. मला तरी तू तापलेल्या उन्हात थंडगार पाण्याच्या शिडकाव्या सारखा वाटतोस. म्हणजे काय ना की आजूबाजूला रखरखते ऊन असते ते काही बदलता येत नाही आपल्याला पण कमीत कमी त्या झळांपासून स्वतःला सांभाळता तरी येते त्या पाण्यामुळे. तसा तू.. शुष्क, मतलबी आणि काहीशा निर्दयी दुनियेत जिणे सह्य खरेतर सुसह्य करायला तुझीच लागते मदत. अर्थात इतक्या गंभीरतेने तुझ्याकडे न पाहता चार क्षणांचा विरंगुळा म्हणून तुझ्याकडे पाहणारेही कित्येक आहेत. कुणी कसेही पाहू देत..
पण मी तुझ्याकडे एक तत्वज्ञान म्हणून पाहतो..
तत्वज्ञान..!

कोणास.. कोणास कशाला.. बहुतेक ढुढ्ढाचार्यांस तुझा नि गहन गंभीर तत्वज्ञानाचा संबंध जोडणे हेच विनोदी वाटेल.. वाटू देत.
पण माझ्यासारख्याला नि तुला देखील.. त्याचे काय होय? आला क्षण नि आला दिवस ..स्वतः आणि इतरांना आनंद देणे अशा लिमिटेड फिलॉसॉफीचे आपण अनुयायी. याला फिलॉसॉफी म्हणता येत असेल तर! कोणाकोणाला हसण्याचे क्षण पुरवत राहणे हा तुझा स्वभाव. तो आवडतो मला. त्यामुळे तुझा विसर न व्हावा हे महत्वाचे.

म्हणजे बघ ना ..
माणूस संकटांकडे कसा कडू काढा प्यायल्यावर तोंड होते तसा पाहतो. तेच त्याने स्वतःला टपल्या मारत पाहिले तर? अरे ती परिस्थिती कदाचित नाही बदलणार.. पण तिच्याशी झुंजायचे बळ तर तू देशील ना! आणि कोणास ठाऊक.. खरे तर तुझ्या मदतीने ती बदलता ही येऊ शकते. शेवटी काय.. कोण कुठल्या चष्म्यातून पाहतो किंवा खरेतर .. पाहू शकतो .. ते महत्त्वाचे! पण उलट्या चष्म्यातून पाहण्यासाठी पण तो तसला चष्मा डोळ्यांवर चढवता आला पाहिजे.. आणि तशी इच्छाही पाहिजे..नाही का?

तू आहेस म्हणून जीवन सुखकर आहे.
तू आहेस म्हणून ताणतणावांना आपले अक्राळविक्राळ हातपाय पसरता येत नाहीत. पण तुझ्यामुळे सत्यापासून दूर पळता येते असे नाही म्हणवत .. त्या सत्य परिस्थितीस तोंड देण्याची हिंमत तू देतोस असे म्हणता येईल. तू चेहऱ्यावर हास्य खुलवण्याचा वसा घेतलास ते खरे .. तू गंभीरतेशी वावडे असल्यासारखा वागतोस हे ही खरे.. पण खरे सांगू.. तू एक गंभीरतेने घेण्याचीच गोष्ट आहेस. आणि ज्यास हे कळले तो तरून जाईल या कष्टप्रद आणि वारंवार झोडपून निराशेत ढकलणाऱ्या निर्मम दुनियेत.. ज्यास हे विनोदाचे तिसरे नेत्र नसेल त्यास त्यामुळे यातना कठीण होणारच या जगात.

तुझा संबंध हसण्याशी..
कधी नुसतेच स्मित..
कधी खळखळून तर कधी गडगडाटी हास्य..
एक पाहिलेस का तू .. बाकी भावभावना असतील ही प्राण्यांना.. किंवा सगळ्या सजीवांना.. पण कोणाला हसताना पाहिले नाही कोणी.. अगदी पाळीव आणि लाडके माणसाळलेले घरचे कुत्रे म्हणा की मांजर.. खुशीत आले नि हसायला लागले असे कधी झालेय का? म्हणजे तू .. आणि हास्य .. माणसाचे व्यवच्छेदक लक्षण मानावे काय? किंवा देवाने

दिलेली मानवाला देणगी? आणि तुझ्यामुळे ती मिळाली आपल्याला.. आणि त्या हसण्याचे ही कित्येक प्रकार केले गेलेत.. अगदी लहान बालकाच्या निर्मळ हास्यापासून खलनायकाच्या छद्मी हास्यापर्यंत. हे आसुरी  हास्य तुझ्यामुळे नाही हे खरे पण बहुतांश हास्यरसात तुझा सहभाग असतो हे खरे..

तसे तुझ्या वाटेवरचे शिलेदार खूप आहेत. अगदी आपल्या महाराष्ट्रातील.. देशातील आणि अख्ख्या जगातीलही. कोणी लेखणीने तुला घडवते कोणी नाट्य- चित्रपटातून. कोणी चित्र वा व्यंगचित्रातून. लोकांना खळखळून हसवणे हाच धर्म असल्यासारखे कोणी वागते. लोक त्यांना मानतात.. ते विदूषक म्हणून. कोणी त्यांना उच्च कोटीचे साहित्यिक वा कलाकार म्हणताना दिसत नाहीत.. अगदी नियम सिद्ध करणारे अपवाद वगळता. आणि त्या विनोदकर्मी आणि विनोदधर्मीयांस त्यांचे पान साहित्यिकांच्या पंक्तीत आडवे मांडले जाते असे वाटावे.. याहून दुर्दैव ते कुठले?

तुझे कित्येक प्रकार आहेत म्हणतात.असू देत.. अगदी लहान बालकाच्या निर्मळ हास्यापासून खलनायकाच्या छद्मी हास्यापर्यंत. हे आसुरी  हास्य तुझ्यामुळे नाही हे खरे पण बहुतांश हास्यरसात तुझा सहभाग असतो हे खरे..
एखाद्या विषयाची चिरफाड करणारे तज्ञ असतात ते तुझेही गंभीरतेने विश्लेषण करतील. करोत.. त्यांचे कामच ते. पण निखळ आनंद देणारा नि हसवून सोडणारा असा तू खरा. बाकी उपरोध नि उपहास ही तुझी चुलत भावंडे म्हणावीत. येता जाता चिमटे काढायला आवडते त्यांना. त्यांची खोडच असली. कितीही मामला बिकट असो त्यांना त्यातही गंमत दिसते! ही तुझी भावंडे खाली डोके वर पाय करून चालतात.. सदैव! एखाद्या गंभीर बाबीला शर्करेत घोळण्याचे काम ते करतात. उगाच रडतोंडेपणा कशाला.. त्यापेक्षा द्या एक शालजोडीत! त्यातही एक आनंद असतो. चिमटे काढतात तेही रेशमी. सदैव उलट्या चष्म्यातून पाहणारे ते मात्र उगाच कुणाला खुपेल असे वागत नाहीत!

पण खरे सांगू ना .. तर कोणाला दुखावून एखाद्यास हसवणारा असा ही तुझा प्रकार असतो म्हणतात. मला तर त्यांच्याशी तुझा दुरान्वयानेही नाही वाटत संबंध. ज्याचे काम हसवण्याचे तोच एखाद्यास .. मग तो त्याचा नावडता माणूस का असेना.. दुखावू शकतो? ही तर विनोदधर्माशी प्रतारणा झाली नाही का?

मी विनोदधर्म म्हणालो.. तत्वज्ञान म्हणालो.. नक्कीच ते गहन गंभीर लोक  रागावतील.. पण का नाही तुला धर्म म्हणू? का नसावे तुझे तत्वज्ञान? आणि नाहीतरी आजकाल खरा धर्म पाळणारे कमीच  दिसतात नाही.. मग हा विनोद धर्म तरी पाळला जाईल अशी अपेक्षा का नि कशी ठेवावी? असो. बोचरा काटेरी आणि कोणास विद्ध करून सोडणारा तू .. तू असावास असे तरी म्हणावे कसे? फार फार तर यास भेसळीचा विनोद म्हणता येईल.. खूपदा असा विनोद राजकारणी करताना दिसतात.. जिथे कोणास निखळ आणि निर्मळ पणे हसवणे हाच विनोदाचा हेतू पायदळी तुडवतात हे राजकारणी.. इतरही अनेक गोष्टींप्रमाणे..तेही आपला क्षूद्र मतलब साधण्यासाठी..  तिथे असल्या नुसत्याच हसवणाऱ्या शब्दांना विनोद तरी का नि कसे म्हणावे? असो.. अशा आपमतलबी किंवा कमरेखाली साळसूदपणे वार करणाऱ्यांकडेच एक विनोद म्हणून दुर्लक्ष करावे हे उत्तम.. हो की नाही.
तर मुद्दा एवढाच की तू तुझ्या निखळ स्वरूपातच आवडतोस.

आजवर गहन गंभीर विचारांतून हे जग घडलेय म्हणतात ना.. एकेक तत्वज्ञान नि नानाविध थियरीज बनल्यात या जगाच्या.. अगदी मानवाच्याच नाही तर या सृष्टीच्या अस्तित्वाच्या. त्यात तू कुठेच दिसत नाहीस. साहजिकच आहे. या गहन जगात तुझे काय काम? चेहऱ्यावरील रेषाही न हलवता ( खरेतर माशी ही न उडवता म्हणायला हवे! ) जगाच्या उद्धाराची चिंता वागणारे हे सारे.. त्यात तू कुठून असणार? पण तू त्यांच्यात नाहीस म्हणून काही बिघडत नाही..
खरे तर जगणे .. त्याची कला म्हणा की शास्त्र म्हणा.. न समजता ही जगायला शिकवू शकतोस तू.. काहीच नाही तर कमीत कमी या निष्ठुर जीवनाचे फटकारे सहन करायला ताकद देतोस तू.. थोडक्यात काय तर तू कित्येकांच्या जगण्यात वंगणाचे काम करतोस.. वंगणच.. खरंय ते.

कधी वाटते तूच नाहीसा झालास तर काय होईल? अनुदिन अनुतापे जगरहाटीत तापलेल्यांना आधार द्यायला तू नसशील तर? पण नाही.. माणूस आहे.. त्याचे हसणे आहे.. तोवर तू राहशीलच.. जोवर माणूस 'बोले तैसा न चाले' चा पाईक आहे तोवर तू राहशीलच.. कारण विसंगती हा तुझा पाया.. आणि त्या पुरवणारे जोवर जोरात आहेत.. तोवर तू ही राहशील.. मला काय वाटते ना.. की येताना रडत आलेल्याला जाताना तरी हसत जाता यावे..असला काही तुझा प्रयत्न असायला हवा का?  अगदी असेच नाही.. पण त्याचे  पृथ्वीतलावरचे वास्तव्य किमान सुखद नि सह्य करण्याचा तुझा उद्देश असायला हवा.. आणि आहे. तू आपले काम इमाने इतबारे पार पाडतोसच. फक्त आम्हा जिवचरांना तुझी किंमत समजून घेता आली पाहिजे..

अधिक काय लिहू.. ज्याचे तुला नि मलाही वावडे.. त्याच गंभीरतेने लिहायला बसलो.. तुलाच लिहिताना अगदी गांभीर्याने लिहावे.. आहे की नाही विरोधाभास? आणि असलाच विरोधाभास हा तुझा पाया आहे!
तेव्हा तू हे धीर गंभीर पत्र वाच.. आणि एक डोळा मिचकावत हास पाहू!

तुझाच..

# ९

# धिनचॅक गंगूस,

तुला लिहतोय ते पयलेच पत्र. तुलाच काय.. कुनालाबी पत्र लिहलेले पयले पत्र. पत्रच नाय तर कायपन लिहतोय ना ते पन लय दिवसानी. आपल्या आयटेमला लिहलेल्या पत्राला मोठे लोक लवलेटर बोलतात म्हने. लिहतोय खरा पन आमची हिम्मत नाय तुला द्यायची हे पत्र. झाली हिम्मत आन दिले तुला तर हे वाक्य गाळून वाच.

तसा आपण लोक आनि आमचा पंटर लोक.. कट्ट्यावर अन नाक्यावर शिट्या मारतात म्हनून सर्वांना म्हायती. उगाच त्यात मी पन बदनाम. पन खरे सांगतो आयच्यान.. जानारी कुणतीबी पोरगी डोले वर करून पाहत नाय.  तशी तू बी गंगू.. तू पन पाहात नसनार.. पाह्यलेस तर कळेल.. त्या शिट्या मारणाऱ्यात मी नसतो. तो दिघ्या, राघू आन मंक्या.. त्यांची आदतच बुरी. साला पोरीबाळींकडे असल्या नजरेने पाहतात. मी त्यातला नाय. कदी तू मान वर करून पाशील तर तुला कळेल मी किती जंटलमन मानूस हाये. तो कुणता सिनेमा होता ना.. आमीरखानाचा रंगीला.. त्यात तो मवाली टपोरी अस्तो.. त्याला ती उर्मी काय पन कारण नस्ताना पटते. खरे सांग तू पन पाह्यला असनार.. तर आपन तर त्यापेक्षा हाप पन मवाली नाय. तो तिकडे ब्लॅक करायचा तिकटे .. आपन कदी असल्या धंद्याच्या वाटेला पन गेला नाय अजून. आईच्यान सांगतो.

तर माझे गंगू.. तुझे खरे नाव खरेच नाय ठाऊक.. पन तुला काल पाह्यला ना त ते गाना आटवला.. गंगू तारूण.. जाव दे. तुला काय बोलतात ती.. गलतफैमी व्हायची. तर मी तुझा नाव माझ्यापुरता गंगू ठेवलाय.. त्यासाठी रागाव नको.
तसा असले लेटर लिहन्याचा एक्सपिरंस आपल्याला नाय आहे. लवच काय सादे लेटर पन आपन लिहत नाय. काय लिहला असता तर नव्वीत शाळा सोडली अस्ती काय? ते आमचा दांडेकर गुर्जी.. चांग्ला मानूस होता..ते बोलायचे.. सख्या कायपन खरडलास तर काय तरी मार्क देइल. पन आपन आईचा ऐकायचा. आई म्हणायची, मास्तरांक तरास नाही देउचो हां सख्या.. तर आपन पेपर कोरा करकरीत द्यायचा.. उगाच गुर्जींना तपासायचा तरास नाय द्यायचा मी. उसूल चा पक्का आपन..शेवटपरेन आईचा आयकला. ते जाव दे..पत्र लिहायचा अनभव नसल्याने थोडा इकडेतिकडे भरकटनार. तसा रात्र न दिवस बसून लिहतो पन चूक झाली तर हासू नकोस

हां.. आनि आमची भाशा पन.. खूप मेहन्तीने लिहतो तर तिला पन हासू नको. त्या मागच्च्या..काय बोलतात त्या बावन्हा बघ म्हंजे झाले.

तर माझे धिनचॅक गंगू, काल तुला पाह्यले ना..ते रापचिक हस्ताना.. तुला सांगतो.. साला कलिजा खलास झाला. कालीज म्हंजे ते मुर्गीवाला नाय.. दिल बोलतात ते. कुनी आमाला मवाली बोलतात तर आमाला काय कालीज नस्ते? सगली मानसं एकसारखी असे बापूजी बोलले होते ना. बापूजी म्हंजे तेच ते नोटेवरले. आपन बाकी काय नाय पन त्यानला मानतो.. सगल्या नोटावर हसत बसायचा काय खायचा काम नाय.. तर कालीज आपनला पन हाय हे खरा. नि ते काल तुला पाहून हल्ला हे पन खरा! ते काय बोलतात.. सोला आना सच तसा!

तर मला पयल्या दिसन्यालाच तू आवडली. तुझे ते हासने.. मोठे मोठे डोले नि लाम केस.. पाहून रातभर झोपला नाय आपन. ते कुठचा जुना पिच्चर हाय ना.. हेमा वाला.. ड्रीमगरल.. तशी तू. आनि त्यात कायतरी ते इग्रंजी बोलतात ना तसे .. लव याट फस्स साईड.. म्हंजे काय ना.. पहिला झूट लव होता तसे. तर असा झालाय खरा. काल पास्नं माझा मन ठिकानावर नाय ते त्याचमुले. आज नाक्यावर पन नाय गेला. आमचे ते पंटर मारत बसले बोंबा.. म्हंजे आज ते परतापभाऊ.. तेच आमदार.. हायेत ना त्यांचा हफ्ता गोला करायची तारीख. पन माझा कामात दिलच नाय लागत. लव झाला की सगळा छान छान दिस्ता.. ते अनिल कपूरचा फाडू डायलॉक हाय ना.. ये प्यार भी कितना प्यारा है.. तसा . मला पन ती राडेबाजीवाली भाशा नाय आवडली आज. आनि हफ्ता घ्यायचा तर राडेबाजी लागतेच ना. ती कशी करनार आज? म्हनून गेलाच नाय नाक्यावर. तू आली ना लाईफ मदे तर एकदम जंटलमन मानूस बनून राहनार आपन. आईच्यान..

काल पास्नं मी तुझाच विचार करतो. दिवसा डोले उगडे अस्ताना पन तूच नि बंद डोल्यामागे पन तूच! काय काय स्वप्ने पायली मी.. ते गाणा बोलतात ना शारूखच्या सिनेमात.. तुमने न जाने क्या ख्वाब दिखाए.. तसा! आपन घर बसवू.. माझी माय पन आता थकत चाल्ली. तिला माझ्या जिवाचा किती घोर. तू आली की ती एकदम खूश होईल. तुझ्यामुले मी लायनीवर यीन.. म्हंजे सरल सांगायचा तर. तुझ्यावर मारलेली लाईन मुले मी लाईन वर यीन असे तिला वाटेल. खरे सांगतो.. तसा आपन चांग्ला मानूस हाये. त्या टपोरी गॅंग बरोबर आपला तसा काय बोलतात तो.. दिल का रिश्ता नाय. तू हा बोल्लीस की पुढचा सगला प्लानिंग करू. लाईफ कसा सेट करून टाकू. तो आमीरखान बोलतो तसा.. सेटल होने को मांगता!

आता परेन तुला माझी सगली स्टोरी लिहली. दिलकी बात लिहली. तू धिनचॅक तर आहेच.. काल साला गॅंग मधला कुनी तुला पाह्यले तर आपला झगडा झाला. आपल्यावाली कडे कुनी पंटर डोला वाकडा करून पाहु नाय शकते. तर सगला असा झालाय एक दिवसमदे. ऐकते ना?

शेवटला एकच लिहतो.. आपन साला असला. किती सोंग आनला तरपण टपोरीपना लपत नाय. तू आवडली मला. दिस्ते चांग्ल्या घरची. आपन डोरे डालतो म्हंजे आपल्याला आवडली म्हनून. इतके लिहले ते शाळेतल्या नऊ वरशात लिहले नसेल. तर आपल्याला आपली जागा ठाऊक हाय.
आवडली म्हनून लिहतो. नंतर फाडून फेकून देनार हे पत्र. तुला तुझ्यासारखा कुनी भेटेल. नि तू सुखी ऱ्हाशील. माझी दुवा हाय. आपला काय.. साला हा जल्म वाया घालवला. आता वेल पन गेली निघून जंटलमनपना करायची. पुडच्या जल्मात सुधरतो आनि भेटू. रागाव नकोस हां.. पंटर असला तरी दिलका सच्चाय आपन.

तुझा असायला पाह्यजे ..
पन नसलेला,

सख्या हरी

# १०
# सत्ता सुंदरीस पत्र..

माझ्या प्राणप्रिय आणि हृदयतुकड्या सत्तासुंदरीस,

काय दिवस आले माझ्यावर..
जिची जोडी माझ्याशी वर्षानुवर्षं जमलेली त्या स्वप्नातील सत्तासुंदरीचा वियोग..
प्रिये काय सांगू..तू गेलीस साथ सोडून आणि झुरतोय तुझ्यासाठी.
प्राणप्रिये.. कधी येशील परतून?

आठवतात ते दिवस..
तुझ्या संगतीने काढलेले..
मी होतो.. तू होतीस.. ते टेबल.. महत्वाची ती खुर्ची.. झेंडे.. रबरी शिक्के.. सगळे सगळे होते.. आताही सारे काही आहे.. बस तू नाहीस .. ते गाणे आहे ना.. ये जीना भी कोई जीना है लल्लू.. तसे .. तुझ्यावाचून ही खुर्ची पण काय खुर्ची आहे सांग.. तूच नाहीस तर या साऱ्यांना काय अर्थ सांग..सर्व काही तूच आहेस ग.. तुझ्याशिवाय मी म्हणजे दात नसलेला वाघ .. नाहीतर शिंग नसलेला गेंडा! गेंडा आणि आम्ही राजकारणी यांच्यात तुलना करायला आवडते लोकांना.. म्हणून हे उदाहरण आणि काय!

मला आठवतात ते दिवस..
खूप वर्षे होऊन गेली.. तू नव्हतीस तेव्हा. तुला दुरून पहायचो.. तुला नसेल त्याची कल्पना.. पण तुझी स्वप्ने पहायचो.. कित्येकदा तर उघड्या डोळ्यांनी!
तुझ्या सुंदरतेने माझे मन मोहून टाकायचीस तू. सुंदरतेचेच नाही तर तुझ्या क्षमतेचेही विभ्रम माझ्या मनात रूंजी घालत अजूनच ओढ निर्माण करायचे तुझी. किती ताकद आहे गं तुझ्यात.. तुझ्या त्या मोहक अदा.. आणि काय काय.. खरे सांगू किती झुरलोय मी तुझ्यासाठी! तेव्हा वाटायचे.. ते कुठल्याशा सिनेमात आहे ना.. तसे.. तुम होती तो यूं होता.. तुम होती तो ये कहती.. तू असतीस तर मी काय काय केले असते.. तू असशील तर काय बहार होईल ..

तसा मी जिद्दी आहे गं.. पार्वतीने जिंकावे शिवास तसे मी तप केले समज  तुझ्यासाठी! तशी तू झालीस प्रसन्न..

तुझा तो सहवास .. धुंद करणारा.. तू भेटलीस आणि दुनिया बदलली. मी बदललो.. एका अर्थाने तू माझ्यातली जिगर जागवलीस.. माझ्यातल्या 'मी' ला मीच तोवर ओळखत नव्हतो तो ओळखायला लागलो. तू आलीस नि माझी मलाच ओळख नव्याने झाली. असे म्हणतात ना, जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती .. तसा जनकल्याणासाठी माझा अवतार.. हे तूच जाणवून दिलेस सखे मला.. माझ्यातील सुप्त ताकद तू नसतीस तर कळली असती का गं सखये? तुला सखये म्हणू ना? म्हणजे तू होतीस तशी आधी.. प्रिय सखी.. जिवाभावाची मैत्रीण.. माझ्या मनातली सहचर.. सहचारिणी. सहचारिणी..? कसे म्हणू मी तुला तसे ? किती दु:ख दिलेस तू मला.. आता तू दुसऱ्या कुणाशी घरोबा रचलास.. काय कमी होते गं माझ्यात? मी तुझ्यासाठी काय काय नाही केले? इतकी वर्षे तू रागावली नाहीस.. आणि आता त्या कुणा उपटसुंभाच्या गोड गोड आणि आश्वासक बोलास भुललीस. कशी काय फसलीस? कसा गं विश्वास बसला तुझा त्याच्यावर?

तशी तू चंचल आहेस म्हणतात सगळे. मलाही ते माहिती होते. पण मला वाटायचे मी तुझा लाडका होतो. कारण तुझी कृपादृष्टी होती. माझ्यावर तर कित्येक वर्षे.. तुझी कृपा होती हे खरे पण त्याला कारण माझे कर्तृत्वही तसे होते. तुझ्यासाठी सारेच करतात मेहनत. तुला वश करण्यासाठी सारेच शर्थ करतात प्रयत्नांची.. त्या साऱ्यांच्या गोड गोड आश्वासनांना भुललीस का गं? माझी तक्रार पण त्यांच्याबद्दल नाही. तुझ्याबद्दल आहे. बघ. साधे एक कॉलेज असते.. त्यात एखादी कॉलेजसुंदरी असते .. कॉलेजक्वीन.. तर त्या सुंदरी मागे सगळे असतातच ना? तसेच आहे हे. तू तर सुंदरींतलीही सुंदरी.. तुझ्यामागे सारेच असणार! पण तू मी असताना त्यांना भुललीस कशी? काय झाले ते तुझे तुला माहित पण मला तरी तुझ्यावाचून जगण्याची कल्पना नाही करवत. आणि सहवत ही. तू अचानक सोडून जावीस?

तू होतीस तर लाल दिवा होता.. ते हुजरे.. ती आजूबाजूला विखुरलेली भुते..भुते म्हटले म्हणून घाबरून जाऊ नकोस हां. अगं आमची शिते असतील तर आमच्याभोवती जमतील ती कोण? भुतेच ना? तर ती भुते .. आणि वेळी अवेळी चालणारी खलबते.. डाव नि प्रतिडाव.. येताजाता

दिल्लीच्या नि तिथून निघून गल्लीच्या केलेल्या फेऱ्या.. फेऱ्या म्हणजे उड्डाणे.. किती मोहमयी नि धुंदी आणणारे दिवस ना ते? विसरलीस का त्या नवीन दिलखेचक घरोब्यानंतर? अशी निर्दयी नि निष्ठुर नको ना होऊस.. आठव आम्ही किती लोकाभिमुख होतो. जनसेवा.. जनकल्याण.. लोकहित.. लोकउद्धार.. आमची ती ब्रीदवाक्ये आठव.. 'एकच हुंकार.. जनउद्धार..' 'दत्ता सरनौबत.. सर्वांसोबत' .. 'एकच सोबत.. सरनौबत सरनौबत.. !' वा! अजून आठवले की रोमांच उभे राहातात अंगावर!

एक सांगायचे परत तुला गं.. तुझ्यामुळे मी होतो, तशी माझ्यामुळे तू होतीस तेव्हा. या सरनौबतावर तू ही नौबत आणलीस. पण सांगून ठेवतो.. पस्तावशील त्या काळतोंड्याकडे पाहात. मान्य आहे की, तू मान्य नाहीस करणार.. मला ठाऊक आहे.. तुझा तो काय म्हणतात...इगो .. मोठाच आहे .. पण तू पण माझी वाट पाहात असणार.. चंचलतेने तू गेलीस खरी.. पण मी रागावलो नाही बरे तुझ्यावर.. हवापालट म्हणून चारदिवस गेल्यासारखी जा.. आणि निमूट परत ये बरे..

अजून काय लिहू? तू तर लिहिणार नाहीस.. तुझे एकच ब्रीद.. बोलणे बंद.. फक्त राबणे.. उगाच नाही सत्ता राबवणे म्हणतात.. एकूण तुला कळले ना मला काय म्हणायचे ते.

तुझ्यासाठी मी झुरतोय.. तू हवीस म्हणून तळमळतो.. जलबिन मछली सारखा..

तेव्हा तू ये.. निघून ये.. त्या काळुंद्र्यास सोडून परत ये.. मी बघतोय वाट तुझी..

ऐकतेस ना? येतेस ना? मी व्रत घेतल्यासारखा.. सत्ताव्रती.. सांगून ठेवतो.. यापुढे असा बाहेरख्यालीपणा नकोस गं करू..

तुझ्याच  वाटेकडे डोळे लावून बसलेला,

ना. दत्तू सरनौबत
माजी मंत्री
कामगार, सहकार..
कल्याण, उद्धार आणि उपकार मंत्री

# ११
# छंदीफंदींस,

कालच पाहिले तुम्हांला.. पाहिले म्हणजे दिसलात तिथे नाक्यावरच्या कट्ट्यावर..
नाही म्हणजे तुमचा तो छंद..
फंद म्हणू का .. की छंदच ठीक?
काय आहे ना काल नाक्यावर पाहिले तेव्हा तोंडात पानाचा तोबरा होता. मला वाटते त्यामुळेच असेल बाजूने गेले तरी शिट्ट्या फुंकल्या गेल्या नाहीत. तसे तुम्ही सुधारायचे नाहीत हे कळते मला.. तोंडातले पान वाया जाऊ नये म्हणून स्वतःच्या मनाला.. खरेतर त्यामुळेच तोंडाला घातला असणार लगाम हे ही कळते मला!

आजवर कट्ट्यावरच्या पोरांपुढून जाताना मान खाली घालून जायची सवय पोरींची..
त्यामुळे वाटेल तुमची हिंमत चांगलीच आहे म्हणून. पण आज सांगायलाच हवे मी. एकट्या दुकट्या पोरीला गाठून छेडणारे तुम्ही भाईबंद.. सारा धरबंद सोडून! पण काही असो..
पाहून फार अभिमान वाटतो..
का, किती नि कसा ते कशी सांगू?

कट्ट्याकट्ट्यावर बसलेल्या त्या फौजा.. वानरांच्या म्हणू तर त्यांच्या निष्पापपणाची उगाच होईल बदनामी. आणि खऱ्याखुऱ्या सैनिकांच्या फौजा म्हणू तर.. अर्थात एवढा अपमान कधी कुणी कुणाचा केला नसेल! समजून घ्या बरं बाबांनो .. अपमान तुमचा नव्हे.. तर त्या जानबाज सैनिकांचा आहे बरे! नाहीतर उगाच गैरसमज!

तर अभिमान वाटतो तो अशा माझ्या देशबांधवांचा..
अहाहा! काय ते दिव्य रूप.. काय ते तेज! कुणी सख्या हरी आहे.. कुणी अजून कुणी.. म्हणजे छोट्या सुलतान.. लंबू पैलवान.. तोतरु कमलान.. ही नावे नाहीत.. एक एक संस्था आहेत स्वतः उगाच काही जणांना तुम्हाला गुंड किंवा मवाली.. नाहीतर उगाच दादा म्हणायची सवय असते पण निष्काम कर्मयोग्यासारखे तुम्ही मनाला नाही लावून घेत काही.. आपल्या ध्येयपथावर उमदेपणाने वाटचाल करीतच राहता.

काय काय नाही करत तुम्ही?
कट्ट्यावर बसून शीळ संगीताची आराधना. दिवस नाही रात्र नाही.. वेळेचे बंधन नाही.. झोकून देऊन केलेली ती टगेगिरी.. जाणाऱ्या येणाऱ्यास छेडणे या ध्येयपूर्तीसाठी अपार मेहनत..या मेहनतीचे चीज व्हावे म्हणून सर्व मिळून करता ती अजून मेहनत.. चोहोबाजूंनी लावून बसणारे तुम्ही फील्डिंग.. वा! तुमच्या या बुद्धिकौशल्यापुढे कोणीही होऊन जाईल हतप्रभ. ध्रुवताऱ्याइतके अढळ स्थान तुम्हालोकांचे या कट्ट्यावर.. खरे सांगते.. अभिमान वाटेल नाहीतर काय? आपल्या ध्येयासाठी असे दिनरात्र एक करणारे.. त्यासाठी काबाडकष्ट करणारे.. त्यापासून जराही विचलित न होणारे असे किती असतात तरूण? भर तारुण्यात तुम्ही असे झपाटून जाऊन बसता ना शिव्या फुंकत.. अभिमान तर वाटेलच ना! त्यात काही काही तर सिनेसंगीताची पण उपासना करतात. त्याचदिवशीची ती गोष्ट.. तो नेहमी चेक्स शर्टातला तुमच्यातला.. आपल्या दुचाकीवर बसून 'आती क्या खंडाला' आळवीत होता. किती मधुर आवाज त्याचा! रागदारीवर प्रभुत्व.. नाहीतर असले शास्त्रीय संगीत त्याच्या कंठातून ऐकावयास मिळावे असे ते महत्भाग्य त्यावेळीस तिथून जाणारीचे. इतके भरून येते सांगू तुमच्या त्या कट्ट्यावरच्या गॅंगला पाहून. अगदी डोळे भरून यावेत असे! त्यात परत व्यायामाची आवड तुम्हा सर्वांना आहेच. दंडातल्या बेटकुळया दाखवत शर्टाच्या बाह्या दुमडत तुम्ही त्या चालीत चालताना पाहूनही अगदी भरून येते. किती मन लावून ब
नवले तुम्हा लोकांना देवाने! मन लावून बनवले नि काही दिवस निद्रिस्त झाला असेल तो शेषशायी भगवान! अजूनही तोंडात बोटे घालून स्वतःच्याच निर्मितीवर खूश होत असणार तो! का नाही व्हावे? असली जगातील रत्ने पैदा करून त्यास स्वतःचाच हेवा वाटत असावा.

पण खरे तर मला लिहावयाचे अजून दुसरेच काही आहे..
सांगूनच टाकावे डायरेक्ट..
तर..
तुमच्या या अवतारात आम्हाला उद्याचा नेता दिसतो.. नेतृत्व नेतृत्व म्हणतात ते जन्मास येते ते यातूनच.. कारण तुमची सामाजिक जाणीव.. खरेच आहे ते..

कारण नुसतेच कट्ट्यावर कूपमंडकीय अस्तित्व नाही तुमचे..
अजूनही बरेच काही..
सामाजिक भान आहे खूप तुम्हांला. कुठे खुट्ट झाले की धावून जाणारे तुम्हीच असता. कोणतेही भांडण होवो वा तंटा.. काही त्याला राडा म्हणतात.. तेथे पहिल्यांदा धावून जाणारे

तुमच्यापैकीच असतात. उगाच डोळेझाक करून पुढे जाणारे पांढरपेशे अशावेळी किती खुजे भासू लागतात. आणि वर तुम्हीच तो राडा केला असा खोटा नाटा आरोप तुमच्यावरच करायला हे मोकळे!

कोणत्याही पक्षाचा बंद.. कारण कोणतेही असो.. समाज सुधारणा करावयास पेटून उठता तुम्ही! इतके ज्वलंत असते तुमचे वागणे की त्या आगीत कधीकधी आजूबाजूच्या बसेस नि गाड्याही आपोआप पेट घेतात! 'बंद' का होतात..? अन्यायाविरुद्ध दाद मागावयास. मग त्या अन्यायाविरुद्ध तुमची मने पेटणार नाहीत असे कसे होईल? कुणीही समाजावरील अन्याय निवारण करणारा पक्ष असो..त्यांचा बंद तुम्ही नसाल तर नाही यशस्वी होत. अशावेळी तुम्ही कार्यकर्ते बनता. कार्यकर्ते म्हणून तुमचे कर्तृत्व झळाळून नि उजळून उठते.
त्यादिवशीचीच गोष्ट..
दंगल उसळली. नेहमीप्रमाणे! आमच्यासारखा सामान्य भित्रा माणूस दंगल झाली म्हणून घरात शेपूट घालून जीव वाचवायला दडून बसतो.. तेव्हा जिवावर उदार होऊन निधड्या छातीने रस्त्यावर उतरतात.. ते तुम्हीच असता. कोणाचे नुकसान होऊ नये याची कोण चिंता तुम्हाला.. दुकाने बंद केली की त्या बिचाऱ्यांच्या दुकानदारांच्या मालमत्तेची तोडफोड नि नासधूस टळते.. रस्त्यावर जाणाऱ्या येणाऱ्यांना ही इजा होऊ नये म्हणून रस्त्यावर उतरू देत नाही.

असे सर्वगुणसंपन्न तुम्ही.. समाजभूषण म्हणायला हवे.. पण ओळखले जाता छंदीफंदी म्हणून.. वाईट नका वाटून घेऊ.. शाळा कॉलेजातले औपचारिक शिक्षण भले नसले झाले तरी जगाच्या विद्यापीठात पदवीधरच नव्हे तर डॉक्टरेट मिळावी इतकी पात्रता अंगी बाणवता तुम्ही.. पण मनाला लावून न घेता ज्या निर्विकारतेने तुम्हीलोक काम करता त्याला तोड नाही.. आणि म्हणूनच हे समजून घ्या..
आज उगाच छंदीफंदी काय .. सख्या हरी काय.. हिणवतात हिणवणारे.. पण तुमचे भविष्य उज्वल आहे.. काही एक क्वालिफिकेशन कमवल्यावर कुणा न कुणा पक्षात तुम्हाला स्थान पक्के. क्वालिफिकेशन म्हणजे.. तुम्ही आता जे करता तेच.. पण फक्त जास्त मन लावून.. मग प्रथम कार्यकर्ता.. नंतर नेता.. खरे हिरे अशा कोंदणातच शोभतात नि उठून दिसतात. उज्ज्वल भविष्यात पुढे नगरसेवकपद.. आमदारकी पण असते लिहिलेली.. अगदीच नशीबवान असाल तर एखाद मंत्रीपदही. अशावेळी नियतीचा काव्यगत न्याय दिसतो. नाहक बदनाम तुम्ही.. तुम्ही कोणी नसताना.. म्हणजे तुमची कुठलाही ओळख बनली नसताना पोलिसांच्या अरेरावीस बळी पडता. तेच लाल दिव्याच्या गाडीत तुम्हाला संरक्षण द्यायला.. यस्सर म्हणून मागेपुढे फिरतात तुमच्या.. आहे की नाही काव्यगत न्याय? हाच दुनियेचा न्याय आहे..

ताकदीला सलाम आहे! आणि अर्थात सत्ता ही ताकद आहे! काय कोठून कोठे पोहोचता तुम्ही.. आपल्या मनगटशक्तीच्या बळावर. आज गल्लीत बसणारे तुम्ही.. पुढे अगदी दिल्लीही खुणावू शकते.
कसा थक्क करणारा प्रवास तुमचा.. कुठून सुरू झाला.. संपतोय कुठे..

जाता जाता उगाच एकच! अगदी विषय सोडून..
तुम्हालोकांची भाषा अतिशुद्ध असते म्हणे. गाळून नि चाळून शुद्ध बनवलेली. एक वेगळी लोकभाषाच म्हणाना! मला स्वतःस ती काय ठाऊक..तेवढी कुवत नाही माझी. पण ती अभिजात टपोरी भाषा आत्मसात न करू शकल्यामुळे ही साधी सरळ घरगुती भाषा वापरत आहे. तुमच्या भाषेशी शर्यत न लावू शकते ही.. न जिंकू शकते. कोणी अमृताते पैजा जिंकण्याची बात करू शकत असेल या मायभाषेत तर तुम्ही त्याही पुढे चार घरे! एकदम तडीपार भाषा ती! सुमडीत कितीही प्रयत्न केले ना तरी कोणाच्या भेजात शिरायची नाय! आता मी त्या लेव्हलची नाही उंची न खोली गाठू शकत.
तर या अशा भाषेबद्दल माफी मागते. जमेल तितकी समजून घे आणि काय?

अजून काय लिहू.. काल कट्ट्यावर तुमच्या गॅंगला पाहिले नि लिहिल्यावाचून नाही राहवले. उद्याच्या नेतृत्त्वाचे असे दर्शन डोळा भरून घेतले मी.. धन्य वाटले सांगते!
तरीही तुम्हा लोकांच्या बदनामीबद्दल वाईट वाटते रे. काय करू. जोवर तुम्ही कुणी बनत नाहीत तोवर उगाच बदनाम होत राहता तुम्ही.. कधी तर वाटते तुम्हा छंदी फंदींचा चांगला जंगी सत्कारच करून टाकला पाहिजे.. फक्त एकदा तुमच्या घरच्या आयाबहिणींना विचारून पुढे काय ते ठरवू.. हो की नाही?

तुझी म्हणण्याचा नाही धीर होत..
तरीही पत्रा शेवटी काहीतरी लिहावे म्हणून..

तुझी..

ता.क.
काल रात्रीच्या राड्यात खूप गडबड झाली म्हणे.. रात्री खूप आवाज होत होता. कोण गेले आत? नाही म्हणजे एवढ्या हिंमतीचा गडी.. नाव ठाऊक असलेले बरे.. पुढेमागे बनणाऱ्या आमच्या नगरसेवकाचे..

# १२
# प्रिय मी..
# म्हणजे .. माझ्यातल्या गेलेल्या 'मी' स,

कालच तू गेलास असे कळले..
तू बातमीयोग्य असतास तर मृत्यू समयी तुझ्यामागे तुझा आत्मा आणि शरीर असल्याची बातमी आली असती पेपरात..

पण तू तसा नुसताच गेलास..
किंवा मेलास..
देहान्त वा देहावसान व्हायला तू काही मोठा कुणी माणूस नव्हतास. निधन पण नाही झाले तुझे.
तू फक्त गेलास.. मेलास नुसता.
जिवंत देह पाठी ठेवून.
आणि कुणी नुसता इसम तू .. तू गेल्याची बातमी यावी इतके काही बातमीमूल्य कमावलेलेस तू? नाहीच ना! तर थोडक्यात काय तू गेलास.. ठार मेलास ..अगदी अनंतात विलीन नाही झालास पण लेखक म्हणून मेलास.

मेलास म्हणजे काय..
मरण्यासाठी काही श्वास बंद पडावा लागतोच असे नाही.. ह्रदय धडधडीत.. धडपणे.. धडधडतेय आणि तू तसाच ते मागे सोडून न धडपडता निघून गेलास.. देहावर तू काही दिसू देत नाहीस गेल्याच्या खुणा. तू  गेला आहेस हे मला सोडून कुणालाच नाही ठाऊक. मग मोठा कुणी असता तरी पेपरात कशी येणार बातमी.. अमूक अमूक आज मेला म्हणून?

तसा तू एकाएकी गेलास असे तरी कसे म्हणावे? तू थोडा थोडा मरतच होतास रोज.. म्हणजे जगत होतास.. जगता जगता मरत होतास.. एकेकाळी कोण्या तत्वज्ञाने म्हटलेय.. 'ये जीना भी

कोई जीना है लल्लू!' तर हेच खरे.. जर 'ये जीना' म्हणजे जगणेच नसेल तर तू मेलासच ना? खरे की नाही? म्हणजे खरे तर हे होतच होते.. क्षणश: कणश:

इंग्लिशमध्ये म्हणतात तसे 'slowly but surely..' क्रमाक्रमाने तुझ्या मरणाची गाथा लिहिली जात होती.. गाथा कसली.. स्क्रिप्ट किंवा पटकथा म्हण..या विश्व पटलावर कोणी एक असा चिकित्सक वृत्तीचा टीकाखोर.. कुणी कसा काय असा जगू शकतो..? त्याला जगण्याचाच हक्क नाकारणारे आहेत चोहिकडे..

आणि त्यांचे म्हणणे काही वावगे नाही..

ते काय म्हणतात ऐक जरा..

ते म्हणतात..

लिहू दे त्याला..

त्याने लिहावे ना..

जरूर लिहावे..

छान मनोरंजक लिहावे..

मस्त गोड गोड गोष्टी.. नाहीतर गोग्गोड कविता..

अगदी स्वातंत्र्य आहे त्यास..

अगदी डायबिटीस झाला ते गोडधोड वाचून तरी चालेल..

पाहिलेस किती उदारमतवादी आहेत ते.. पण तू कसला..

नसत्या उठाठेवी बसलास करत.. उगाच कसले कसले विचारतोस प्रश्न.. तुझे काय काम आहे हे? उत्तरे शोधतोय.. नि नको ते प्रश्न उकरून काढतोस.. सांगितल्या कुणी उचापती.. हे होणारच होते.. आमचे एक कोकणी दोस्त म्हणतात ना तसे.. अरे तुझा पगार किती.. तू बोलतो किती! अगदी खरंय ते बाबा. तुझी जित्याची खोड काही जाईना.. कुत्र्यासारखी शेपूट सरळ काही होईना.. मग हे होणारच होते.. आधीपण तुला इशारे दिले होते जाणत्या जणांनी.. तूच जाणून नाही घेतलेस ते..

आणि ..

काल त्याचा शेवटचा अध्याय लिहिला गेला असावा.. तुला मरणे भाग होते.. तसा तू गेलास.. चांगले झाले.. चांगला दिवस होता रे कालचा.. अगदी संकंष्ट चतुर्थी.. मरण्यासाठी भाग्य लागते या दिवशी.. त्यादिवशी तुला जाता आले.. आभार मान.. की अजूनही तुझा ताठा कायमच आहे की सगळेच दिवस पवित्र असतात म्हणून..? का तू यांच्या श्रद्धांवर उडवतोस असले निर्लज्जपणे अश्रद्धेचे शिंतोडे..

तसा तू मोठा होतासही.. नव्हतास ही. मोठा होतास कारण तू लिहित असायचास सदा. आणि मोठा नव्हतास ही .. कारण तुझे ऐकणारे होते का कुणी आजूबाजूला? नव्हतेच.. वाचणारे होते .. पण समजणारे? तू लिहायचास.. लेखणीला तुझ्या धार होती. नुसतीच नाही तर चांगली उपहासाची धार होती.. तरवारीने वार करून कोणास घायाळ केलेले दिसते समोर.. तू जे काही करायचास तो गनिमी कावा. तुझ्या वारांनी व्हायच्या जखमा पण दिसायच्या नाहीत. रक्त न सांडता रक्तपात घडवायचास तू. समाज असो की राजकारण.. सामाजिक नि राजकीय परिस्थिती तुझ्या लेखणीतून सुटायची नाही.. मग तू तीच लेखणी घेऊन लागायचास मागे. त्यातून सपासप घाव घालायचास. कोणाच्या श्रद्धांना अंधश्रद्धा म्हणायचास.. कोण्या राजकारण्याच्या बोलांतला फोलपणा दाखवायचास. तुझे ते लिखाण उगाच बोचरे असायचे. काटे काय टोचतील .. तुझे शब्द टोचून जायचे. जखमा करायचे कधी.. कधी जाणूनबुजून खपल्या धरलेल्या जखमांवरल्या खपल्या काढून जखमेचे खरे स्वरूप दाखवून द्यायचे. पण समाजपुरूषास निद्रिस्त राहावयासच आवडते फार.. मूर्खासारखा तू त्याला गदागदा हलवून जागे करायचास. एवढेही ठाऊक नसावे तुला की ज्वालामुखी निद्रिस्त असलेलाच बरा! पण हे तुला कोण सांगणार? आणि तुला पटणार काय ते? उगाच त्याला जागवून वाकुल्या दाखवून तू चिडवणार तर तुझ्या कर्माची फळे तुला भोगावी लागणारच कधी न कधी? करावे तसे भरावे हा या जगाचा नियमच आहे.. तर गेलास ते आपल्या कर्मानेच.

पण असा गेलास ते बरे झाले..
जीव सलामत तर पुढच्या गोष्टी पचास! नाहीतर मागे काही खरोखरच स्वर्गवासी झालेले .. कुणी काही म्हणो.. जनकृपेने त्यांची भेट लवकरच घडवून आणली गेली त्या जगन्नियंत्याशी. तू त्यामानाने नशीबवान. तुला दुसरी संधी दिली गेली.. खरेतर तूच घेतलीस ती.. आता रामनाम जप कर.. हरिनामात दंग हो.. कारण नसताना उचापती नकोत.. आमच्या श्रद्धा नि धर्मावर नकोत.. आमच्या श्रध्दास्थानी असणाऱ्या बाबा नि बुवांवर नकोत.. आमच्या लाडक्या राजकारण्यांवर नकोत.. आणि नकोत म्हटले म्हणजे लगेच लिहिण्याच्या स्वातंत्र्यास हिरावून घेतले म्हणून तर नकोच नको. चांगले आयुष्य मिळाले ते सत्कारणी लाव.. भजन कीर्तन कर..सत्संगात रमव मन आपले.. उगाच सकळांना शहाणे करून सोडण्याचा शहाणपणा करू नकोस .. आणि एक.. सर्वात महत्त्वाचे.. उगाच प्रश्न विचारू नकोस.. नसत्या शंका काढू नकोस.. एवढे एक शिकलास ना की बास! मग शतायुषी होशील.. तुला मरणच नाही मग जणू समज!

काहीतरी चुकतेय माझे हे खरे..

चूक म्हणजे.. अगदी विसरलोच रे.. तू मेलायस आधीच.. मेलेली कोंबडी हालचाल करत नाही.. तू पण घे तिचा आदर्श.. छान निपचीत रहा पडून.
जीव तर गेलाच आहे तुझा.. तर ऐक..
राहवत नाही म्हणून मित्रत्वाचा देतो सल्ला.. तुला म्हणजे.. माझ्यातल्या मी ला. आता मरून झाले.. मरणोत्तर जग नसते कुठेच.. तेव्हा आता तो मी नाही.. नवा मी मात्र घडू शकतो. थोडे नमते घे.. थोडे कलाकलाने घे.. ज्या साऱ्यांच्या हाती कर्तुमअकर्तुम सत्ता आहे.. त्या साऱ्यांशीच. देवाने दिलेले एकच नाशवंत आयुष्य हे. सार्थकी लाव. हरिगुण गायनाहून प्रभावी आहे ते या साऱ्यांचे गुणगायन.. भक्ती आणि सश्रद्ध पूजा. तू मेलास खरा.. पण अगदीच पूर्ण मरू नकोस.. अजून हातात लेखणी आहे ना ती वापर या सर्वांच्या कल्याणासाठी. नीतीमत्तेच्या फुकाच्या वांझोट्या गप्पा मारणे सोड. छान शहाणा हो.. मग बघ हे सारे येतात की नाही मागे मागे. झालेच तर कमावशील नाव.. पैसा आणि पारितोषिकांचे ढीग ही कदाचित.. वाममार्गास लागू नकोस.. पुनर्जन्म झालाय.. तो भगवान चरणी व्यतीत कर.. आपापल्या काळात चलती असणारे भगवान कोण.. हे मात्र तावून सुलाखून ठरव.. म्हणजे बघ.. या पुनर्जन्मात जातोस की नाही पुढे ते.. शेवटी काय.. पुढे जात राहाणे हे महत्त्वाचे.. तुला पण आधी तेच हवे होते ना.. पण तुझा मार्ग चुकलेला.. पुढे जाणे म्हणजे काय याची व्याख्या चुकली.. आणि खरेतर सारे
काहीच चुकलेले .. आता मरणोत्तर तरी सुधर..
पुन्हा नव्याने जन्मेन मी म्हण.. आणि उभा रहा.. वाकल्या कण्याने.. कर मुजरा आणि हो अमर..

एवढे जरी शिकलास तरी मरण सार्थकी लागले म्हणायचे तुझे.. मरणात खरोखर जग जगते म्हणतात ना ते असे..
आधी अति किंवा दीड शहाणा होतास.. स्वतःस शहाणा समजणारा.. आता खरा शहाणा हो..
दुनिया मुठ्ठीमें करायची आस बाळग..
हो पुढे..
आणि पुढेच जात रहा..!

तुझाच ..
'मी' निघून गेल्यावर राहिलेला मी..

# १ ३

# अनादि अनंतास,

तुला लिहिण्याचा हा पहिलाच प्रसंग..

लिहितोय ते तुला पोहोचेल की नाही. ठाऊक नाही.. मुळात तू आहेस का? असशील तर तुझा पत्ता काय? तू आहेस म्हणतात तर जगभरात हे का असे दु:ख पसरलेले रे? गोंधळलोय मी.. म्हणूनच तर हे पत्र.. जसा मी मनातून गोंधळलोय ना तोच तुला पत्रातही दिसेल.. आणि हा गोंधळ हाच तर या पत्राचा गाभा आहे असे समजून वाच. आणि जमल्यास दे उत्तर..

कोणी तुला घालते साकडे.. कोणाला भेटीलागी आस.. कुणी कासावीस.. आणि तुझ्या भेटीसाठी काय काय नाही करीत ते? कुणी तुझ्या नामस्मरणात दंग.. कुणामुखी सदा भक्तीरंग.. कुणी तुझ्या चरणी लीन .. कुणी भजनात तल्लीन.. कुणी म्हणे .. रंजले गांजले.. त्यांच्या सेवेत तू भेटशील.. कुणी अखंड विश्वास  व्यापून तू दशांगुळे उरलास असे सांगून गेला.. कुणी पाहते तुला सगुण रूपात तर कुणी कुणी म्हणे नाही घडणार दर्शन कारण तू तर निर्गुण निराकार. मोठमोठे होऊन गेले संत आणि महात्मे.. सारे तुझ्या भेटीचा ध्यास घेऊन जगले .. आणि तो घेत घेतच तुझ्या भेटीस पोहोचले.. तुला भेटले ना रे ते सारे?

काय आहे ना.. या जगात सगळा गोंधळ माजलाय बघ! तो ही कसा? तर तुझेच नाव घेऊन! मी सांगावे असे नाही .. तू सर्वज्ञानी.. अंतर्यामी.. पण हे पाहून एकच मागणे रे .. साकडे म्हण.. एकदा तरी दर्शन देच..

एकदा तरी स्वत:च्या तोंडून सांगून टाक तुला नक्की काय आवडते.. उगाच 'ह्याच्या त्याच्या' तोंडून नकोस पाठवू संदेश.. हे 'ह्याच्या त्याच्या' म्हणजे असतीलही तुझी खास माणसे.. पण सांगू आम्ही साधे लोक आहोत ना त्यांचा विश्वास नाही या संत नि महात्म्यांवर. कुणी म्हणाले.. ढाई अक्षर प्रेम का.. जे का रंजले गांजले वगैरे.. कुणी सांगून गेले.. जनसेवा हीच ईश्वर सेवा.. आणि काय काय सांगून गेले ते मोठे लोक. आम्ही वाजवल्या टाळया..आम्ही भजने केली.. टाळ

कुटत कीर्तने केली.. सारे काही केले. फक्त त्यांच्या खऱ्या उपदेशास सोडून. खुलभर दुधाची कहाणी वाचली, दर श्रावणात अगदी मनोभावे पण  पण त्यातला अर्थ नाही समजून घेतला. आम्ही व्रते केली..तुला प्रसन्न करायला आम्ही मंदिरात गेलो.. न जाणो तुझा इतरही देवांशी असेल कॉंटॅक्ट तर.. मशीदीत चादरी घेऊन गेलो .. चर्चमध्ये मेणबत्त्या पेटवल्या.. तुला वाहतो आम्ही गोडधोडाचा नैवेद्य.. तूच निर्मिलेली फुले तुझ्याच झाडावरून ओरबाडून तुलाच परत वाहतो आम्ही. तुला नवस बोलण्याची लाचखोरीही करून पाहतो आम्ही. एक्सचेंज ऑफर्स ही चालतात आमच्याकडे. तू बनवलेलेचे प्राणी .. बोकड काय की कोंबडा काय .. तुझ्याच पायाशी कापताना आमचे हात नाही कापत. उलट भक्तीचा उन्माद संचारतो आमच्या अंगात. कोणत्या आईबापास आपल्याच अपत्याची आपल्याच डोळयांसमोर हत्या झालेली पाहायला आवडेल .. असला नतद्रष्ट विचार नाही येऊ देत आम्ही आमच्या मनांत. आम्ही तुला हवे, आवडते म्हणून , तुझ्याच इच्छेखातर सारे करत राहतो. आणि तुझी इच्छा.. ती आम्हाला कशी कळली.. हा विचार ही येऊ देत नाही आम्ही मनात..

पण सांगतो या गोंधळास तूच आहेस जबाबदार.. स्वत:स विधाता म्हणवतोस.. विश्वकर्मा म्हणवतोस.. मग हा गोंधळ ही तूच नाही का निर्मिलास? तुझे ते मौन..तुझे संशयास्पद असणे.. कित्येकदा असून ही नसल्या सारखे असणे ..कसा रे तू असा?
यदा यदा ही धर्मस्य .. ग्लानिर्भवति.. तेव्हा तू येतोस म्हणे.. पापाच्या घड्याच्या भरण्याची वाट पाहतोस म्हणे.. दुष्ट दुर्जनांचे निर्दालन करतोस म्हणे.. एका प्रश्नाचे देशील उत्तर? तुझ्या हातून असे दुष्ट बनतातच कसे? तू दयाळू आहेस.. कृपाळू आहेस .. तुझ्या भक्तांनाच तू पावतोस..वगैरे खूप ऐकून आहे मी.. पण एकदा सारी सृष्टी तुझीच निर्मिती म्हटले की त्यात तू हे डावे उजवे का ठेवलेस रे? किमान एक दुसऱ्यास प्रेमाने वागवण्याइतपत  तू या मानवास सुसंस्कृत का नाही बनवलेस? की तुझा हिशेब पक्का आहे? दुख में समरण सब करे.. म्हणून तू दु:खे वाटलीस? ज्या दुनियेत नायक आहेत तिच्यातच खलनायकही.. ज्यात शोषक आहेत त्याच दुनियेत शोषितही.. जिथे तू संत महात्मे घडवलेस तिथेच भोंदू आणि छद्म संतही बनवलेस.. विचार केल्यास वाटते.. तू आहेस ना खरेच.. की निव्वळ आमच्या मनाची एक सनजूत? असशील तर कुठे तरी काहीतरी चुकतेय असे नाही वाटत तुला?

या सगळयांवर एकच उपाय आहे.. या भूतलावर तू तुझ्या रूपात जन्म घे. समस्या इतकीच की तुला आम्ही ओळखू कसे? तुला पाहिले तर कोणीच नाही.. जी काही चित्रे नि मूर्ती आहेत त्या साऱ्या आमच्याच कल्पनेतून आल्यात रे..

तसे तुझे खूप लाडही केलेत आम्ही.. कौतुक केले तुझे.. आरत्या गायल्या.. स्तोत्रे स्तवने लिहिली आणि गायली.. तू ईश.. ईश्वर.. परमेश्वर.. विधाता.. जगन्नियंता.. तुझ्या भक्तीत आयुष्य घालवतो.. तुला आवडते म्हणून पूजा अर्चा करतो.. तुला होम हवन आवडते म्हणे.. व्रतवैकल्ये.. उपासतापास.. नवससायास.. सारे तुझ्या आवडीखातर.. इतके लाडावूनही तुझ्याकडून ठोस काहीच उत्तर नाही.. सत्यमेव जयतेच्या जयघोषात असत्य असंख्य छोट्यामोठ्या लढाया कशा जिंकतात रे? की तिथे तुझे केलेले लाड कमी पडतात? अन्याय होताना कुठे रे जातो तुझा ईश्वरी बाणा? जगात असंख्य दु:खे वाटताना कुठे जाते तुझे देवपण? सांग तू खरेच आहेस?

आणि तू नाहीस असे पण कसे म्हणावे? तान्ह्या बाळाच्या दंतविहीन हास्यात तूच असतोस.. नि पहिल्या हिरव्या तृणपात्यात ही तूच दिसतोस.. त्या फुलांच्या गंधकोषी तू असतोस..निसर्गातल्या विभ्रमात तू.. निसर्गातल्या चमत्कारात तू.. रात्रंदिन तान्हुल्याला सांभाळणाऱ्या माऊलीत तूच असतोस.. दिनरात्र पोराबाळांची काळजी वाहणाऱ्या पित्यात ही तूच दिसतोस.. दीन दुबळ्यांची सेवा करणाऱ्यांत तू असतोस..एखाद्या आनंदवनात झडलेल्या मनांची नि तुटलेल्या मनांची मशागत करून सावरणारा ही तूच असतोस..तू आहेस की नाही कुणास ठाऊक.. पण तू नाहीस असे तरी का म्हणावे?

हा असला तिढा.. हा ही तूच बनवलास ना रे? एकदा दर्शन दिलेस तर खुलासा होईल. देशील का? माझ्या सांगण्याखातर? जो तुझे अस्तित्वच आहे की नाही विचारतोय.. जो तुझी भक्ती सर्वमान्य मनुष्याच्या पद्धतीने करत नाही..

शेवटी एकच.. माझी आई.. जिला  कधीच तू तुझ्याकडे बोलावून घेतलेस.. ती असती तर रागावली असती.. तुझी निस्सीम भक्त ती. तुझी चेष्टा खपायची नाही तिला.. तुलाच लिहिलेले असे पत्र वाचून व्यथित झाली असती ती.. पण काय करू .. मी पुरता गोंधळलोय रे.. ऐकतोस ना?

तुझाच
एक भक्त .. (म्हटले तर चालेल ना?)

# १४
# प्रिय मृत्यूस ..

मृत्यो..
फार लाड झाले तुझे.. नसता दरारा.. नसता वचक..
करून करून रे काय करशील..
तुझ्या हातात आहेच अजून काय?
कुणी म्हणतात तुला हात नाहीच.. नुसत्याच कराल दाढा आहेत तुझ्या जबड्यात आणि तू निर्दयी आणि क्रूर आहेस..अक्राळविक्राळ.. आहेसच .. काळ आहेस तू..
पण एखाद्या प्राणिमात्राचे हृदय बंद पाडण्यावाचून नि मेंदूचे काम बंद करण्यावाचून तुला येते तरी काय?
तू निर्दयी आहेस..
तू होत्याला नव्हते करतोस..
लहानथोर बघत नाहीस..
खरेच आहे ते.
चिमुकल्या एक दोन दिवसांच्या बाळासही उचलून नेताना तुझे हात नाही कापत नि तसाच तू नव्वदी गाठलेल्या जख्खड म्हाताऱ्यास ही त्याच तटस्थतेने नेतोस.. तुझ्यापुढे रंक काय नि राव कय सारे समान आहेत हे खरे.. पण एखाद्या नुकत्याच उमललेल्या आयुष्यास संपवताना कसला रे मिळतो तुला आसुरी आनंद? तान्ह्या बाळाच्या आईसही तू उचलतोस.. तेव्हा त्या चिमुकल्या जिवाची काही पर्वा नाही वाटत तुला? देशाच्या एखाद्या शूर शिपायास उचलताना तू सलाम करतोस त्याला? नाही.. तुझ्यालेखी तो ही सारखा नि एखादा निर्ढावलेला चोर ही सारखा. सगळ्यांना त्याच निर्ममतेने नेतोस तू..
विचार कर..
हे जग सुंदर आणि राहाण्याजोगे करायला कितीकांनी मेहनत घेतलीय.. काही त्यातले तर indispensable म्हणावेत असे.. पण तुला काय त्याचे.. धरली मानगूट नि नेला वरती.. असला खाक्या तुझा! अरे कोणी थोर लोक झाले.. महात्मा झाले.. संत .. तुझ्या लेखी ते एक जीवधारी प्राणी ज्यांचा अंत घडवणे हे तुझे कर्तव्य आहे.. मग त्यांच्या मागे लोकांची काही उडो दैना..

तू माझ्या आईला नेलेस.. वडलांना नेलेस.. आयुष्याच्या उत्तरार्धात एक एक करून अजून कोणाकोणाला नेशील..त्यात माझा ही असेल एकदा नंबर..

आहे खरी ही गंमत..

कारण तुला घाबरावे असे तुझ्यात काहीच नाही..

घाबरावे कोणास..

ज्यापासून आपण आपला बचाव करू शकू असा कोणी असल्यास..

तू असला आहेस?

मुळीच नाहीस रे..

एकदा तू ठरवलेस की कोणाचे तू ऐकणार नाहीस नि एखाद्याची प्राणज्योत विझवल्यावाचून तू राहणार नाहीस..

असे असताना कशाला हवी ती तुझी मिजास? का कोणी दबून रहावे तुझ्यापुढे.. वाघ म्हटले की खातो .. वाघोबा म्हटले तरी खातोच.. तर तुला मरण म्हणू की मृत्यू .. यायचा तो तू येणारच नि न्यायचा तो नेणारच!

खरे सांगतो..

भीती तुझी नाहीरे वाटत..

तू आल्यावर मग काय ?

असल्या अज्ञातास घाबरतात लोक. आणि तू घेऊन गेल्यावर त्या माणसाच्या मागच्यांचे काय.. याला घाबरतात लोक.. आणि तू मारे समजून चालतोस .. तुलाच घाबरतायत लोक म्हणून! अरे, एकतर गेलेल्यास कसले काय जाणवते.. मेलेली कोंबडी नाही घाबरत आगीस. तर तुझ्या त्या यमदूताचा कशाला हवा नसता तोरा?

पण अजून विचार केला ना तर काय वाटते सांगतो ...

जिथे सुरूवात आहे तिथे शेवट असतोच.. अगदी हा आसमानी सूर्य.. त्याला ही अंत आहे.. एखादी गोष्ट सुरू झाली की तिचा अंत अटळ आहे.. सृष्टीच नियमच तो.. मग त्याच्यापुढे कोणाचे नाही काही चालत.. त्या नियमासच तुझे नाव दिले नि तू मोठा तोऱ्यात सर्वांच्या मानगुटीवर चढून बसलास..आणि घडवतोयस उत्पात.

खरे सांगू तर तू तो यमदेव नाही आहेस.. मुळात तू जीवन दाता देव असूच शकत नाहीस .. तू घेता आहेस.. असेही त्या देवास कोणी पाहिले.. तू मात्र दिसतोस पदोपदी.. लाडक्याचा अचेतन

देह कुरवाळणारी  माता..आईला वा पित्याला मांडीवर डोके घेऊन निरोप देणारा त्यांचा  मुलगा .. आयुष्याच्या दोन्ही टोकांत तू दिसतोस..

पण तुझे ते रहस्य कळलेय मला..
तू एक सृष्टीचा नियम आहेस फक्त..
ज्या गोष्टीस सुरूवात तिचा अंत..
अटळ बाब आहे ही..
तसे न झाल्यास सगळे जाईल कोलमडून.. हे जगाचे रहाटगाडगे चालायचे तर.. जन्म हवाच.. आणि तू ही हवाच! तुझे कर्तव्य कठोरपणे तू निभावतोस.. आणि बदनाम ही होतोस.. अर्थात तुला त्याची काय तमा..

असे असले ना तरी तू सुंदरच असणार.. तुझे येणे म्हणजे देवाघरी जाणे ते असुंदर कसे असू शकेल? तू तुझ्या वेळी ये.. असेही आपले प्रियजन आहेत त्यांना तू आधी घेऊन गेलेलाच आहेस.. भेट होईल त्यांची.. पण तोवर ..

तोवर मी एकच करीत राहणार..
तू सुंदर असलास तरी हे आयुष्यही सुंदरच आहे.. ते अजून सुंदर करणार.. बाकी तू आहेसच .. खेळ कधी संपवायचा ते ठरवायला!
होय की नाही?
तेव्हा आता आपली दोस्ती व्हायला हरकत नाही..
येशील तेव्हा भेटूच!
तोवर..

तुझाच..